रविवार, 07 ऑगस्ट 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 14
Title Code : MAHMAR51117


# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 07 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-14 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

## जगदीप धनखड देशाचे नवे उपराष्ट्रपती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारताचे उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांचा कार्यकाळ थोड्याच दिवसात संपणार आहे. व्यंकय्या नायडू यांच्यानंतर पुढील उपराष्ट्रपती कोण असेल याच्या चर्चा सुरु होत्या. भाजपप्रणित रालोआकडून जगदीप धनखड आणि विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीकडून मार्गारेट अल्वा यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, रालोआच्या जगदीप धनखड यांनी मार्गारेट अल्वा यांना पराभूत केले आहे. भाजपचे लोकसभा आणि राज्यसभा असे मिळून ३९४ खासदार आहेत. याशिवाय जदयू, अण्णा द्रमुक, लोकजनशक्ती पार्टी, एकनाथ शिंदे समर्थक खासदार, बीजेडी, वायएसआर काँग्रेस, बसपा, अकाली दल, टीडीपी यांचा पाठिंबा असल्याने जगदीप धनखड यांचे पारडे जड मानले जात होते. कागदावर जगदीप धनखड यांना ५२७ खासदारांची मते मिळणार असल्याचे दिसून येत होते. एकूण ७२५ खासदारांनी मतदान केले. ७१० मते वैध ठरली तर १५ मते अवैध ठरली. जगदीप धनखड यांना ५२८ मते मिळाली तर मार्गारेट अल्वा यांना १८२ मते मिळाली.



**५५ खासदारांची मतदानाला दांडी**

उपराष्ट्रपती निवडणुकीत टीएमसीने तटस्थ राहण्याचा निर्धार केला होता. टीएमसीच्या ३४ खासदारांनी मतदान केले नाही. भाजपच्या २, समाजवादी पार्टीचे दोन आणि शिवसेना आणि बसपाच्या एका खासदाराने मतदान केले नाही. मात्र, तृणमूल काँग्रेसच्या दोन खासदारांनी पक्षादेश डावलून मतदान केले. शिशिर अधिकारी आणि दिब्येंदू अधिकारी मतदान केले आहे.

**निकालापूर्वीच जगदीप धनखड यांच्या गावी जल्लोष**

जगदीप धनखड हे मूळचे राज्यस्थानमधील आहेत. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीला उभे राहण्यापूर्वी ते पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. जगदीप धनखड यांच्या राजस्थानातील झुंझुनूमधील किठाणा गावात गावकऱ्यांनी जल्लोष करायला सुरुवात केली आहे.

## पाऊस पुन्हा झोडपणार

### राज्यात पुढील 5 दिवस मान्सून सक्रिय राहणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : श्रावण सुरु झाल्यानंतर काही काळ विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा पडायला सुरुवात केली आहे. राज्यातील काही भागात मागच्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली. कोकण, मध्य महाराष्ट्रासह, विदर्भ, मराठवाड्यात पावसाने काही जिल्ह्यात पावसाच्या सरी बरसल्या. आता पुढील 5 दिवस राज्यातील कोल्हापूर, सातारा, पुणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, मुंबई, नाशिक, ठाणे, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या भागांत 9 ऑगस्टपर्यंत हवामान विभागाने 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. तर मराठवाड्यातही मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने दिला आहे.**

पुढील 5 दिवस राज्यात मान्सून सक्रिय राहणार असून त्यातही हळूहळू वाढ होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यातील जिल्हास्तरीय इशाऱ्यांबरोबरच मच्छिमारांसाठी आणि खोल समुद्रात जाऊ नये, यासाठीही इशारे देण्यात आले आहे.

बंगालच्या उपसागरातील मध्य पूर्व आणि उत्तर पश्चिम भागात 7 ऑगस्टला कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे. यामुळे पावसाचा जोर आणखी वाढणार आहे. सध्या बंगालच्या उपसागरापासून ते आंध्र प्रदेशाच्या किनारपट्टीपर्यंत हवेच्या वरच्या भागात द्रोणीय स्थिती तयार झाली होती. त्यामुळे राज्यात पाऊस सक्रिय झाला आहे. कमी दाबाचा पट्टा तयार होणार असल्याने या भागाकडून राज्याकडे बाष्प वाहू लागले आहे. त्यामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांत अतिमुसळधार पाऊस बरसणार आहे. तर उर्वरित भागातही मुसळधार पाऊस पडणार आहे.

**या जिल्ह्यांना अलर्ट**

कोल्हापूर, पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक, पुणे (घाटमाथा), सातारा, औरंगाबाद, चंद्रपूर,



गडचिरोली, गोंदिया या भागात 6 ते 9 ऑगस्ट या भागांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### अतिवृष्टीचा इशारा

11 ऑगस्टपर्यंत राज्यात सर्वदूर पाऊस असल्याचे सांगण्यात आले आहे. कोकण, गोवा, घाटमाथ्यावर अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईतही 7-8 ऑगस्टला मुसळधारची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. राज्यातील अनेक भागात पाऊस पुन्हा बरसण्यास सुरुवात झाली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची हजेरी सोलापूर, यवतमाळ, जालना, धुळे यासह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला आहे.

## भाजपचे मिशन लोकसभा; ९ केंद्रीय मंत्री महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्र सरकारच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचल्यात की नाही याची पाहणी करण्यासाठी ९ केंद्रीय मंत्री हे महाराष्ट्रातील १६ लोकसभा मतदारसंघात प्रवास करणार आहेत. या प्रवासात कार्यकर्त्यांशी संवाद आणि पक्ष संघटनेवर विशेष भर दिला जाणार आहे. याच लोकसभा मिशनची माहिती देण्याकरिता भाजप सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषद घेतली.

महाराष्ट्रातल्या १६ लोकसभा मतदार संघात ९ केंद्रीय मंत्री प्रवास करणार आहेत. १८ महिन्यांचा हा प्रवास असेल. या १८ महिन्यात ६ वेळा केंद्रीय मंत्री महाराष्ट्र दौरा करणार आहेत. प्रत्येक प्रवास हा ३ दिवसांचा मुक्कामी प्रवास असणार आहे. या ३ दिवसांच्या प्रवासात २१ कार्यक्रमांची रचना करण्यात आली आहे. या काळात पक्षीय बदल, स्थानिक पातळीवरील अडी अडचणी, संघटनात्मक कार्यक्रम, धार्मिक स्थळांना भेटी, कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी असे कार्यक्रम नियोजित आहेत.

या ३ दिवसीय मुक्कामी प्रवासात कल्याण लोकसभेत



आणि मध्य मुंबईत केंद्रीय मंत्री अनुरागसिंग ठाकूर, दक्षिण मुंबईमध्ये नारायण राणे, पालघरमध्ये विश्वेश्वर तुडू, रायगड आणि शिर्डी मतदारसंघात प्रल्हाद पटेल, बारामतीला निर्मला सीतारमण, औरंगाबाद आणि बुलढाणा लोकसभा मतदारसंघात भूपेंद्र यादव, चंद्रपूरला हरदीपसिंग पुरी या केंद्रातील प्रभावी मंत्र्यांवर संबंधित लोकसभा मतदार संघाची जबाबदारी असणार आहे.

भाजपच्या कार्यक्रमांमध्ये धार्मिक स्थळांना भेटी, आध्यात्मिक गुरुंच्या गाठीभेटी, सामाजिक कार्यकर्त्यांच्या भेटी, सहकार क्षेत्रातील अग्रणी नेते, व्यापारी, वकील, डॉक्टर यांच्या वेगवेगळ्या बैठका, पत्रकार संवाद, सर्व स्तरावरील संघटनात्मक, शासकीय अधिकारी यांच्या बैठका तसेच स्वस्त धान्याच्या दुकानात देखील केंद्रीय मंत्री भेट देणार आहेत. केंद्र सरकारकडून राबवलेल्या योजना सर्वसामान्यांपर्यंत नीटपणे पोहोचत आहेत का? याची पाहणी करण्यासाठी केंद्रीय जागोजागी जातील.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली आगामी लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने तयारी सुरू केली आहे. भाजपने मिशन २०२४ हाती घेतले आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत पराभव झालेल्या १४१ जागांवर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. या जागा जिंकण्याची जबाबदारी केंद्रीय मंत्र्यांकडे देण्यात आली आहे.

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या मंत्र्यांवर १४१ जागांची जबाबदारी दिली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीची घोषणा होईपर्यंत हे मंत्री त्यांना देण्यात आलेल्या मतदारसंघांत जाऊन तिथल्या परिस्थितीचा आढावा घेतील आणि रणनीती आखतील. २०१९ मध्ये भाजपचा १४ मतदारसंघांमध्ये पराभव झाला. या जागा जिंकण्यासाठी भाजपने चार समूह तयार केले आहेत. या १४ मतदारसंघात सध्या समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष आणि काँग्रेसचे खासदार आहेत.

## देशात सर्वात स्वस्त पेट्रोल 84.10 तर डिझेल 79.74 लिटर पोर्ट ब्लेअरमध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलवरील व्हॅट कमी केल्यानंतर, आता देशातील सर्वात महाग इंधन राजस्थानच्या श्रीगंगानगरमध्ये मिळत आहे. यापूर्वी महाराष्ट्रातील परभणीमध्ये सर्वात महाग पेट्रोल मिळत होते. आज सर्वात स्वस्त पेट्रोल पोर्ट ब्लेअरमध्ये 84.10 रुपये लिटर तर डिझेल 79.74 रुपये लिटर आहे. श्रीगंगानगरच्या तुलनेत पोर्टब्लेअरमध्ये पेट्रोलचा हा दर तब्बल 29.39 रुपयांनी कमी आहे. तर डिझेलचा दरही 18.50 रुपयांनी कमी आहे, अर्थात स्वस्त आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी शनिवारी पेट्रोल आणि डिझेलचे नवे दर जाहीर केले आहेत. जनतेला पेट्रोल आणि डिझेलच्या दरांसंदर्भात सातत्याने दिलासा मिळत आहे. आजही देशभरात पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर आहेत. यात कुठल्याही प्रकारचा बदल झालेला नाही. महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलवरील व्हॅट कमी केल्यानंतर, आता देशातील सर्वात महाग इंधन श्रीगंगानगरमध्ये मिळत आहे.

**प्रमुख शहरांतील पेट्रोल-डिझेलचा दर**

दिल्ली - पेट्रोल 96.72 तर डिझेल 89.62, मुंबई - पेट्रोल 111.35 तर डिझेल 97.28, कोलकाता - पेट्रोल 106.03 तर डिझेल 92.76, चेन्नई - पेट्रोल 102.63 तर डिझेल 94.24, लखनौ - पेट्रोल 96.57 तर डिझेल 89.76, पटना - पेट्रोल 107.24 तर डिझेल 94.04, भोपाल - पेट्रोल 108.65 तर डिझेल 93.90, पोर्ट ब्लेयर - पेट्रोल 84.10 तर डिझेल 79.74.

## भारतीय महिलांचा विजयी डंका!

### राष्ट्रकुल स्पर्धेत इंग्लंडला ४ धावांनी चितपट करून गाठली अंतिम फेरी

आधुनिक केसरी न्यूज

**बर्मिंहॅम :** राष्ट्रकुल स्पर्धेत भारत आणि इंग्लंड यांच्यामध्ये अंतिम फेरीसाठी लढत पार पडली, ज्यामध्ये भारतीय संघाने ४ धावांनी विजय मिळवून फायनलचे तिकिट मिळवले आहे. भारताने प्रथम फलंदाजी करून २० षटकात ५ बाद १६४ एवढी धावसंख्या उभारली. स्मृती मानधनाच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर भारताने यजमान संघाला १६५ धावांचे आव्हान दिले होते. इंग्लंडच्या संघाला २० षटकात ६ बाद १६० धावा करता आल्या आणि भारताचे फायनलचे तिकिट पक्के झाले. शेवटच्या षटकात इंग्लंडला विजयासाठी १५ धावांची आवश्यकता होती. मात्र स्नेह राणाने शानदार गोलंदाजी करून इंग्लिश फलंदाजांना आपल्या तालावर नाचवून निसटता विजय मिळवला. शेवटच्या ३ चेंडूमध्ये इंग्लिश संघाला १३ धावांची आवश्यकता असताना राणाने तीन चेंडूत अनुक्रमे १,१ आणि ६ अशा धावा देऊन भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

पहिल्या डावात स्मृतीने क्रिकेटच्या पंढरीत आपल्या फलंदाजीने इंग्लिश गोलंदाजांना घाम फोडला आणि अवघ्या ३२ चेंडूत ६१ धावांची शानदार खेळी केली. इंग्लंडच्या संघाने सुरूवातीपासूनच ताबडतोब फलंदाजी करून भारतीय गोलंदाजांवर दबाव टाकण्यास सुरूवात केली होती मात्र भारतीय गोलंदाजांनी सांघिक खेळी करून फायनलमध्ये प्रवेश मिळवला. यजमान संघाकडून सोफिया डंकले (१९), डॅनी व्याट (३५), एमी जोन्स (३१) आणि ॲलिस कॅप्सीने (१३) धावा केल्या. भारताकडून स्नेह राणाने २ तर दीप्ती शर्माने १ बळी पटकावला आणि डाव सावरला. तर ॲलिस कॅप्सी आणि कर्णधार नॅट सायव्हर या धावबाद झाल्या.

तत्पुर्वी, भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आपल्या कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत स्मृतीने शानदार फलंदाजी केली आणि संघाला चांगली सुरूवात करून दिली. स्मृतीने तिच्या खेळीमध्ये एकूण ८ चौकार आणि ३ षटकारांच्या जोरावर अवघ्या २३ चेंडूत अर्धशतक झळकावले आहे. भारतीय संघाने सुरूवातीपासूनच इंग्लंडच्या गोलंदाजांवर दबाव टाकला होता मात्र मानधना बाद होताच भारताचा डाव फिसकटला.




अखेर इंग्लिश संघाने सामन्यात पकड बनवून भारताला २० षटकात १६४ धावांवर रोखले.

भारताची सांघिक खेळी

मानधनाला वगळता कोणत्याच भारतीय फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. शेफाली वर्मा (१५), हरमनप्रीत कौर (२०), दीप्ती शर्मा (२२) आणि जेमिमा रॉड्रिग्जने ३१ चेंडूत नाबाद ४४ धावांची खेळी करून भारताला एका मजबूत स्थितीत पोहचवले. इंग्लंडकडून फ्रेया केम्पने सर्वाधिक २ बळी घेतले तर कर्णधार नॅट सायव्हरला आणि कॅथरीन ब्रंटला प्रत्येकी १-१ बळी घेण्यात यश आले.

राष्ट्रकुल स्पर्धा २०२२ मध्ये भारतीय संघाचा आपल्या सलामीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाला होता. नंतर आपला कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानला चितपट करून भारताने उपांत्यफेरीकडे कूच केली. दरम्यान, बारबाडोसविरूद्धच्या सामन्यात मोठा विजय मिळवून भारताने उपांत्यफेरीत प्रवेश मिळवला. भारतीय संघ १ पराभव आणि २ विजयासह इथपर्यंत पोहचला होता. स्मृती मानधनाने सुरूवातीपासूनच आक्रमक फलंदाजी करून भारताला मजबूत स्थितीत नेऊन ठेवले होते. या मराठमोळ्या खेळाडूने पाकिस्तानविरूद्ध देखील ताबडतोब अर्धशतकी खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला होता.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## जो हुकूम मेरे आका...

आधुनिक केसरी

मग मीच त्याला म्हटलं, ' मित्रा, तू गेलेला वेळ परत देऊ शकत नाहीस. आरोग्य परत देऊ नाहीस. कायमस्वरूपी आनंद, समाधान देऊ शकत नाहीस. मग काय उपयोग या सगळ्याचा ? '

तो तत्परतेने म्हणाला, ' सच बताऊ मेरे आका ? मैं ये सब ले सकता हूँ लेकिन वापस दे नही सकता. मैं तुम्हारा समय निगल जाता हूँ. तुम्हारी सेहत, तुम्हारी निंद, तुम्हारा सुख चैन सब कुछ मैं निगल जाता हूँ. लेकिन मेरी एक खुबी हैं. मैं यह सब करता हूँ इसका पता बहुत कम लोगोंको चलता हैं . '

मी हे सगळं ऐकून थक्कच झालो. ' बापरे ! किती धक्कादायक आहे हे सगळं ! आपण समजतो काय आणि प्रत्यक्षात आहे काय ! आपल्याला वाटतं सगळं फ्री मिळतं आहे पण त्या बदल्यात ते काय मौल्यवान गोष्टी घेऊन जातं ते कळत नाही. आवळा देऊन कोहळा काढण्यासारखंच आहे हे. घरातल्या लोकांशी गप्पा, फिरणं, व्यायामाचा वेळ, मित्रमंडळींशी गप्पागोष्टी या सगळ्याच गोष्टींवर या ' जो हुकूम मेरे आका ' मुळे खूपच वाईट परिणाम झाला आहे. छे छे , काहीतरी करायलाच हवं. मी त्याला म्हटलं, ' अरे बाबा, एवढं सगळं सांगतो आहेस त्याबद्दल धन्यवाद ! पण मग यावर उपाय काय करायचा तो पण तुलाच माहित असेल. तो जरा सांग ना... '

' जो हुकूम मेरे आका. देखो मालिक, मैं ये सब करता हूं इसलिये जरुरी नही की आप भी यह सब अपना सारा समय देकर मेरे पीछे पडे. सबसे किमती चीज तो समय हैं. इसका इस्तेमाल बहुत सोच समझकर करना चाहिए. अपने सभी जरुरी काम पुरे करने चाहिये. उसके बादही कुछ समय निकालकर मेरे पास आईए. मेरा उपयोग सीमित और निश्चित समयके लिये करना चाहिये. जो मेरे पीछे जितना पडेगा, मैं उतनाही उनके पीछे हाथ धोकर पडूंगा इसमें कोई शक नही. लेकिन जो लोग सोच समझकर मेरा इस्तेमाल करेंगे, मैं उनकी मददही करुंगा. '

मी म्हटलं, '  खरं आहे बाबा तुझं. आता मी तुझा मर्यादित वेळेसाठी आणि महत्वाच्या कामासाठीच तुझा वापर करणार. माझ्यासारख्या वापर करणाऱ्यांना तू त्रास देऊ नकोस. '

जीन किंचित झुकून विनम्रतेने म्हणाला, ' जो हुकूम मेरे आका. ' आणि पुन्हा तत्परतेने बाटलीत बंदिस्त झाला.



आनंदी पहाट

## ध्वनी प्रदूषण टाळावे

आधुनिक केसरी

फटाकेबाजी आणि घोषणाबाजी करणाऱ्या कोणालाही काळवेळेची जाणीव होत नाही, त्याचे भान रहात नाही. एकप्रकारे शक्तीचे आणि पैशाचे प्रदर्शन करणारे फटाकेबाजी आणि घोषणाबाजी हे दोन्हीही स्वतःसाठी, स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी, प्रसिद्धीसाठी आणि स्वतःचे महत्व वाढवण्यासाठी करत असल्याचे अगदी सर्वसाधारण व्यक्तीला देखील दिसत आणि कळत असते. आनंदोत्सव साजरा करणे निश्चितच गैर नाही परंतू काळवेळ विचारांत घेणे, जनजीवन विस्कळीत न होऊ देणे तितकेच महत्वाचे असते. फटाकेबाजी आणि घोषणाबाजी करताना रस्ते आडवले जातात त्याचा पादचारी आणि वाहन चालकांना खूपच त्रास होत असतो, हे देखील विचारांत का बरे घेतले जात नाही? वाढत चाललेली लोकसंख्या, त्यांच्या गरजांची पूर्तता, पायाभूत सुविधांवर त्यानुषंगाने आलेला ताण, बदलती जीवनशैली ह्या सर्वांचाच परिणाम नागरीकरण आणि शहरीकरणावर कमी अधिक प्रमाणात सर्वच बाबतीत होत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. ही खरे तर खूप मोठी नागरी समस्या आहे, ह्या समस्येचा अत्यंत गांभीर्याने, प्राधान्याने अभ्यासपूर्वक विचार केला पाहिजे. अलीकडच्या काळांत सर्वत्र वाहत्या वाहतुकीचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली कि, कर्णकर्कश हॉर्न आणि तेही गरजेशिवाय वाजवले जातात, वाहन जलद गतीने चालवण्यामुळे होणारे ध्वनी प्रदूषण, अनेकदा आकारण विशेषतः टू व्हीलर्स इकडून-तिकडून मोठमोठ्याने हॉर्न वाजवत फिरवल्या जातात. ह्याचा इतरांना त्रास होऊ शकतो ही जाणीव का बरे होत नाही? वाहतूक जेव्हा वाहती असते तेव्हा अनेकदा अशा समस्या उद्‌भवतच नाहीत. ह्यासाठी काय टाळायचे आणि काय पाळायचे हे समजून घेणे आवश्यक आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-33

## हसत निरोप घेऊ या...

आधुनिक केसरी

भूतकाळ असो की वर्तमान निरोप हसत-हसत देता आला पाहिजे. म्हणजे आपले जगणे सुखकर होते. भूतकाळातील दुःखाचे सावट आपल्या वर्तमान जीवनावर राहात नाही .भूतकाळ सोबत घेऊन वर्तमान जगता येईल, पण भविष्यकाळ अवघड होऊन जातो.

सुखदुःख येतात आणि जातात. कोणाला किती स्थान आपल्या जीवनात द्यायचे ते आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने ठरवू या.  हे सगळं फक्त आपण वाचायचं नाही तर आपल्या मुलांना, आपल्या नातवांना शिकवायचं आहे .त्यांना उंच गगन भरारी घेणारा गरुड पक्षी बनवायचे आहे. त्यांचे पंख न छाटता त्यांच्या पंखात बळ भरायचे आहे. उंच झेप घेण्यासाठी फिनिक्स पक्षासारखी. ते ज्या फांदीवर बसले आहेत ती फांदी योग्य वेळी कापायची आहे .जेणेकरून ते आपला आळस, मरगळ झटकून उंच भरारी घेतील.

आणि कितीही उंच भरारी घेतली तरी पुन्हा जमिनीवर येतील याची काळजी आपल्याला घ्यायची आहे.

लहान मुलांना पिंजऱ्यातील पोपट किंवा पिंजऱ्यातील वाघ बनवायचे नाही, तर त्यांच्या साठी सहजपणे मुक्त बागडण्यासाठी झाड लावायचे आहे. सुंदर बाग बनवायची आहे. जेणेकरून निसर्गाशी त्यांची मैत्री होईल.  पर्यावरणाचे त्यांना महत्त्व कळेल .गाड्यांमुळे किती प्रदूषण वाढले आहे असे म्हणायचे आणि स्वतःच्या घरात चार चार गाड्या वापरायच्या.  हाकेच्या अंतरावर जाण्यासाठी सुद्धा गाडी पाहिजे. कसे पर्यावरण वाचणार! ? भूतकाळात चुका नको.झाल्यास तर वर्तमानात दुरुस्त करू. म्हणजे भविष्यकाळ आनंददायी होईल .मागे घडलेल्या प्रत्येक गोष्टीला हसत हसत निरोप देऊन कुठलंच मळभ मनात नको. स्वच्छ नितळ मनाने जगू या....

## देवाला नैवेद्य दाखवणे हा पूर्ण भक्तीयोग

आधुनिक केसरी

### गणपतीचा नैवेद्य ठरलेला मोदक

गणेश हा बुद्धीदाता आहे. आणि मोदकातील पुरण म्हणजे गुळ खोबरे आणि वर तूप हे कॉम्बिनेशन म्हणजे साक्षात बुद्धिवर्धक योग आहे. बूस्ट बोर्नव्हीटा, माल्टोव्हा, कॉम्प्लान इ. म्हणजे फक्त टीनचे डब्बे. बाकी त्यात सोयाबीनची टरफले, नारळाची भुशी आणि शेंगदाण्याचा चोथाच असतो. जरा जाहीरात दाखवायची खोटी, पडले तुटून त्या डब्यावर. हे जाहिरात तंत्र या कंपन्यांना बरोब्बर माहिती आहे, त्यामुळे जाहिरातींचा मारा करून, सचीन, कपील इ. ब्रॅण्डचा वापर केला की, आपले प्रॉडक्ट खपते. चोथा खाऊनच जर वजन वाढणार असेल तर मग असली नारळ आणि शेंगदाणेच का नकोत ? नारळ  आणि शेंगदाणे खाऊन तब्येत सुधारत होती. घरच्या घरी बारा बारा बाळंतपणे होत होती. टॉनिक म्हणून काय होते ? गुळ आणि शेंगदाणे. नारळ आणि गुळ. जो आपल्याकडे नैवेद्य म्हणून दाखवला जात होता आणि आमच्याच घरातील बाल हनुमान आणि बाल गणेशांना प्रसाद म्हणून मिळत होता. भक्तीपूर्ण नैवेद्याला, कोलेस्टेरॉलच्या भीतीने बदनाम केले गेले आणि जाणीवपूर्वक आरोग्याचा व्यापार सुरू झाला.

### देवीला पुरणाचाच नैवेद्य लागतो

पुरण म्हणजे चणे. हरभरे डाळ शिजवून गुळ घालून केलेले मनगणे असो वा कडबू असोत, पुरणाची पोळी असो वा नुसते पुरण असो, आणि या सर्व नाजूक नैवेद्यावर साजूक तूपाची धार... फक्त ताकद वाढत होती. वेगळ्या टॉनिकची गरज नव्हती. घोड्याला काय खाद्य दिले जाते ? हरभरेच ना ? घोड्यासारखी गती आणि वाजीकर शक्ती मिळवण्यासाठी तसेच तेच खाद्य आपल्याला मिळण्याची व्यवस्था आपल्या देवांच्या नैवेद्यामधून केलेली होती. गॅस वाढतो, पित्त वाढते, जाडी वाढते म्हणून जेवणातून चणाडाळच हद्दपार केली आणि प्रोटीन पावडरचे डब्बे मात्र जिममधे खपवले जाऊ लागले. हे कधी लक्षातच आले नाही. नागपंचमीला नागोबाला लाह्या, हळदीच्या पानात लपेटलेल्या पातोळ्या, पानगे, गोकुळाष्टमीला शेवग्याच्या पाल्याची भाजी, कोजागिरीला आटीव दूध, गुढीला श्रीखंड, हे नैवेद्य आरोग्य रक्षण करणारेच होते. नारळीपौर्णिमेला नारळीभात ठरलेलाच. नारळावरूनच ओळखली जाणारी ही पौर्णिमा!

वेगवेगळ्या ऋतुमधे येणारे वेगवेगळे सण आणि या निमित्ताने होणारे नैवेद्य हे जणु काही आरोग्याचे बूस्टर डोसच होते. दरवर्षी नियमाने घ्यायचे आणि आरोग्य सांभाळायचे !

**वैद्य सुविनय दामले**

"निरूपण"

आधुनिक केसरी

**परित्यक्ता देवा विविधविधसेवाकुलतया**
**मया पञ्चाशीतेरधिकमपनीते तु वयसि।**
**इदानीं चेन्मातस्तव यदि कृपा नापि भविता**
**निरालम्बो लम्बोदरजननि कं यामि शरणम् ॥५॥**

गणेशाला जन्म देणाऱ्या हे माता पार्वती! अन्य देवतांची आराधना करण्याच्या वेळी मला अनेक प्रकारच्या सेवांमध्ये व्यस्त राहावे लागे. त्यासाठी पंच्याऐंशी वर्ष आयु व्यतीत झाल्यानंतर मी अन्य देवतांची आराधना सोडून दिली. आता त्यांची पूजा, सेवा माझ्याने होत नाही. त्यामुळे त्यांचेकडून साहाय्याची अपेक्षा नाही. यावेळी तू तुझी कृपा माझ्यावर केली नाहीस, तर आई, निराधार असा मी कोणाला शरण जाऊ? || ५ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

विशेष



## उंबरठा

आधुनिक केसरी

उंबरा म्हणजे लाकडी दाराच्या चौकटीत खालच्या बाजूस बसविलेले जाड, रुंद आणि सपाट लाकूड. दाह शमन करणारा आणि दीर्घकाळ पाण्यात टिकून रहाणारा वृक्ष म्हणजे उंबराचा वृक्ष. म्हणूनच पूर्वीच्या काळात घराचा उंबरा हा उंबराच्या खोडापासून बनत असे. या वृक्षाच्या नावावरुनच दाराच्या चौकटीत बसवायच्या या लाकडाचं नाव उंबरा असे पडले असावे. उंबराचा वृक्ष हा कृतिका नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे आणि त्याच्या औदुंबर या नावाने त्याला शुभ असे धार्मिक अधिष्ठानही प्राप्त झालेले आहे. घरात शिरताना शुभ वृक्षाच्या लाकडाला ओलांडून प्रवेश केल्यास घरातील उर्जा कायम सकारात्मक राहिल, या हेतूने उंबराच्या वृक्षाचा वापर होत असावा, असाही कयास करता येईल.

काही लोक याच उंब-याला उंबरठा असेही म्हणतात. उंब-यापाशी उभं राहून आपण येणा-या व्यक्तीची वाट बघतो. उंबरा ओलांडून एखाद्या भिक्षेक-याच्या झोळीत भिक्षा टाकतो. नववधू घराच्या उंबरठ्यावर ठेवलेले माप लांघत घरात प्रवेशते.

उंब-याला गृहित धरत आपण बरेचसे शुभ अशुभ संकेत मानतो. घरातल्या उंब-याच्या खूप सा-या भूमिका असल्या तरीही माझ्या मते उंबरा असते एक मर्यादा. उंबरा असते एक सीमारेषा. उंबरा म्हणजे आपल्याला भानावर आणणारी नेमकी गोष्ट.

बाहेरुन घरात येणा-यांसाठी आपला इगो चपलांच्या सोबत बाहेर काढून ठेवायची जागा म्हणजे उंबरा. प्रवेशत असलेल्या घरातल्या चालीरीतींना मान देत आपण वागायचं आहे हे उंब-याची वेस ओलांडतानाच मनात बिंबवून यायचं असतं. आणि, घरातून बाहेर पडत असताना त्या घराने आपल्यावर केलेले संस्कार बाहेर पडल्यावरही आपण विसरणार नाही, हे आपल्या लक्षात आणून देणारी जागा म्हणजे उंबरा. उंबरा म्हणजे आत्मभान जागृत ठेवणारं स्थान.

उंब-याबाहेर पडल्याशिवाय जग काय आहे हे कळत नाही हे म्हणतात ते अगदी खरं आहे. उंबरठे झिजवल्याशिवाय यश पदरात पडत नाही हे सुद्धा खरंच. पण उंबरठे झिजवताना आपल्यावर आपल्या उंब-याने केलेले संस्कार लक्षात ठेवले तर निसरड्या जागांचा सामना करणं सोपं होत असतं. अजून एक गोष्ट इथे नमूद करायलच हवी. ती म्हणजे - उंब-याच्या बाहेर पडण्यासाठी फार मोठं धैर्य लागतं आणि बाहेरच्या जगात वावरण्यासाठी मर्यादेचं फार मोठं भान. हे भान जे कोणी जपतं त्याचं आयुष्यात नेहमीच सुंदर होत असतं.

**संकलन :- अशोककाका कुलकर्णी**

# भगवंताचा आनंद हा निरुपाधिक असतो

आधुनिक केसरी

प्रत्येक मनुष्याची प्रवृत्ती भगवंताकडे जाण्याची असते, कारण त्याला आनंद हवा असतो. मनुष्याला आनंदाशिवाय जगता येत नाही. पण सध्याचा आपला आनंद हा नुसता आशेचा आनंद आहे. तो काही खरा आनंद नाही. उद्या सुख मिळेल या आशेवर आपण जगतो, पण ते सुख क्वचितच मिळते. ज्या आनंदातून दुःख निघत नाही तोच खरा आनंद. जगण्यामध्ये काहीतरी आनंद असला पाहीजे. जगणे जर आनंददायक आहे तर मग आपल्याला दुःख का होते ? वास्तविक आपण कशाकरीता काय करतो हेच विसरतो. म्हणजे मनुष्य जगतो आनंदासाठी, पण करतो मात्र दुःख ! दारूचा आनंद हा दारूची धुंदी आहे तोपर्यंतच असतो, त्याचप्रमाणे विषयापासून होणारा आनंद, तो विषय भोगीत असेपर्यंतच टिकतो. दृष्य वस्तू ही सत्य नसल्यामुळे, ती अशाश्वत असते. अर्थात तिच्यापासून मिळणारा आनंद हा देखील अशाश्वत असतो. आपण जगामध्ये व्याप वाढवितो, तो आनंदासाठीच वाढवितो. पण भगवंताच्या व्यतिरिक्त असणारा आनंद हा कारणावर अवलंबून असल्याने, ती कारणे नाहीशी झाली की तो आनंद पण मावळतो. यासाठी



तो आनंद अशाश्वत होय. म्हणून खरा आनंद कुठे मिळतो ते पाहावे. खरा आनंद दृष्य वस्तूंमध्ये नसून वस्तूच्या पलीकडे आहे. चिरकाल टिकणारा आनंद वस्तूरहितच असतो. म्हणून आनंदासाठी वस्तूच्या मागे लागणे बरोबर नाही. विषयाचा आनंद परावलंबी असतो, तर भगवंताचा आनंद निरूपाधिक असतो. स्वानंद स्मरणाव्यतिरीक्त जे स्फुरण तोच विषय समजावा.

खरी आनंदी वृत्ती हीच दसरा-दिवाळीची खूण आहे. हास्य हे आनंदाचे व्यक्त स्वरूप आहे. कोणतीही वस्तू अस्तित्वात नसताना होणारा जो आनंद, तेच परमात्म्याचे व्यक्त स्वरूप आहे. आनंदाला जे मारक आहे ते न करणे म्हणजे वैराग्य, आणि आनंदाला बळकटी येण्यासाठी जे करणे त्याचे नाव विवेक होय. आनंद म्हणजे आत्मचिंतनाने येणारे मानसिक समाधानच होय. जो निस्वार्थबुद्धीने प्रेम करतो, त्याला आनंद खास मिळतो. घेणारा 'मी' जेव्हा देणारा होतो त्याच वेळेस त्याला खरा आनंद होतो. ब्रह्मानंद हा प्रत्येकाच्या हृदयात स्वयंभू आहे. वृत्ति वळवून तो चाखला पाहिजे. एकांतात स्वस्थ बसावे, रामाला आठवावे, त्याच्या पायावर मस्तक ठेवून त्याला म्हणावे, "रामा, माझे मन शुद्ध कर. देहबुद्धी देवू नको. तुझे चरण, तुझे हास्य, मला सदा पाहू दे. तू माझ्या मस्तकावर वरदहस्त ठेव". रामाला प्रेमाने आळवून, राम परमानंदरूप आहे असे जाणून, त्याच्याशी अनन्य होऊन राहावे. मी कुणीच नाही, सर्व राम आहे आणि मी रामाचा आहे, या गोड भावनेत आनंदाने असावे.

**-श्रीसद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# आधुनिक केसरीच्या दणक्यानंतर राष्ट्रीय महामार्गाच्या मलमपट्टीला सुरुवात




आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** सोलापूर-धुळे (क्र 52) या राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे याबाबत आधुनिक केसरी दैनिकात वृत्त छापून येताच खड्डे बुजवण्यास संबंधित कंपनीकडून सुरुवात करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील येडशी टोलवे ते पारगाव टोलवे या दोन्ही टोलमधील अंतरामध्ये खड्ड्यांचे साम्राज्य वाढून रस्त्याचे चाळण झाल्याबाबत आधुनिक केसरीमध्ये वृत्त छापून आले असता, संबंधित कंपनीकडून त्याची दखल घेत तात्काळ या खड्ड्यांचे मलमपट्टी करण्यास सुरुवात केली आहे.

**सध्या तरी रोडवरील खड्डे बुजवून घेऊ**

तर पावसामुळे डांबर प्लांट बंद आहे. पाऊस काळ संपल्यानंतर रोडवरील खचलेल्या भागाचे वरील थराचे काम करण्यात येईल असे आश्वासन संबंधित कंपनी अधिकाऱ्याकडून देण्यात आले आहे.

# नक्षलवाद्यांनी मागितली 50 लाखांची खंडणी

## नजर अंदाज केल्यास परिवारातील सदस्याला जिवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यात काही तालुके नक्षलवादग्रस्त होते. परंतु अनेक वर्षांपासून नक्षलग्रस्त कारवाया झाल्या नाही. त्यामुळेच शासन दप्तरी असलेले जिल्ह्यातील नक्षलवादग्रस्त तालुके रद्द करण्यात आले आहे. अशातच गडचिरोलीत नक्षल दलमच्या कमांडरने पत्र पाठवुन घाटंजी शहरातील इसमाला 50 लाख रुपये खंडणी मागितली आहे. नजर अंदाज केल्यास परिवारातील सदस्याला जिवे मारण्याची धमकीही दिली आहे.

घाटंजी येथील गजानन लक्ष्मण ढवळे (रा. जगदंबा नगरी) यांना नक्षली कमांडरच्या नावे ५० लाख रुपयांच्या खंडणीसाठी पत्र आले आहे. पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली आहे. या पत्राने घाटंजी शहरात आणि पोलीस दलात खळबळ उडाली आहे. ढवळे यांना २ ऑगस्ट रोजी पोस्टाद्वारे लाल रंगाचा लिफाफा आला. त्यातील पत्र वाचून ढवळे यांना धक्काच बसला. या पत्रात, 'मी गडचिरोली नक्षल दलम कमांडर क्र. ३८ असून, मला ५० लाख रुपये द्या, अन्यथा तुम्हाला जीवे मारू', अशी धमकी देण्यात आली होती. याप्रकरणी अखेर ४ ऑगस्टला घाटंजी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

हे पत्र हिंदी भाषेत लिहिले आहे. त्यात 'ढवळे तुम्हाला लाल सलाम, तुम्ही मला ५० लाख रुपये द्या. याकडे कानाडोळा केल्यास आपल्या परिवारातील सदस्यांना जीवे मारु', असे या पत्रात नमूद आहे. खंडणीची रक्कम १२ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजता उमरी ते करंजी मार्गापासून तीन किलोमीटर अंतरावर हनुमान मंदिराजवळ असलेल्या दरगाहच्या मागे आणून ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

या पत्रामुळे ढवळे कुटुंबीय भयभीत आहे. हे पत्र कोठून आले, कोणी लिहिले याचा सुगावा अजूनही लागलेला नाही. ढवळे यांच्या तक्रारीवरून घाटंजी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराने घाटंजी शहरासह जिल्ह्यात खळबळ उडाली असून नक्षलवादी पुन्हा सक्रीय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# 375 फुट विशाल तिरंग्यासह किलबिल प्राथमिक शाळेची रॅली

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकीन :** भारतीय स्वातंत्र्यास ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यामुळे हे वर्ष स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणून साजरा करण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. म्हणून बिडकीन येथील कृष्णापुर भागातील किलबिल प्राथमिक शाळेच्या वतीने आझादी का अमृत महोत्सव व भारतीय स्वतंत्रताची 75 वर्ष पूर्ण होत असताना तो उत्सव विद्यार्थी, पालक व गावकरी यांच्या समवेत साजरा करताना 375 फुट लांब तिरंगा ध्वजासहित रैली काढून विद्यार्थी यांनी विविध देशभक्ति पर घोषणा देत परिसर दणाणुन सोडला.

याप्रसंगी संपूर्ण गावकरी विद्यार्थी यांची देशभक्ति कौतुकाने पाहत होते. जेथे प्रशासनाच्या वतीने या अमृत महोत्सवानिमित्त सर्व शाळाना गावातुन प्रभातफेरी सह जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायम स्वरूपी मनात राहावी या उद्देशाने हर घर तिरंगा बद्दल जनजागृती व तिरंगा झेंडाविषयी संहिता काय आहे हे गावकरी यांना विद्यार्थ्यांनी पटवून दिले. यावेळी लेझिम पथक यांच्या चित्तथरारक हालचाली विविध तिरंगा ध्वजातील वेशभूषा सहित उठून दिसत होत्या. यावेळी अनेक विद्यार्थी केशरी, पांढरा व हिरव्या रंगाच्या वेशभूशेत होती.

या रॅलीची लक्षवेधी बाब म्हणजे 375 फुट विशाल तिरंग्यासह अनेक मुलांनी स्वतंत्र लढ्यातील विविध क्रांतिकारक, स्वातंत्र्य सैनिक, राष्ट्रीय नेत्यांची वेशभूषा यासोबत देशभक्ति पर गीत, घोषणाने सर्व गावकरी यांचे लक्ष वेधून घेतले. सर्व गावकरी यांना आपआपल्या घरी 13 ते 15 ऑगस्ट या कालावधित सर्व नियमचे पालन करुन तिरंगा ध्वज उभारण्याचे आवाहन करुन सांगता करण्यात आले.

# पन्नास वर्षात पहिल्यांदाच झाली आगरनांदुर ग्रामपंचायत निवडणूक

## नंदिकेश्वर ग्रामविकास पॅनलने मारली बाजी

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुक्यातील धरणग्रस्त गाव आगरनांदुरला स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा मिळाल्याने प्रथमच नागरिक निवडणुकीसाठी समोरे गेले. त्यात नंदिकेश्वर ग्रामविकास पॅनलने 9 पैकी 8 जागेवर विजय मिळवला. माजी मंत्री संदिपान भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली व विलास भुमरे यांच्या नेतृत्वाखाली पॅनल प्रमुख संजय थोरात यांनी पॅनल उभा करून विजय मिळवल्याने विलास भुमरे यांनी निवडुन आलेल्या नवनिर्वाचित सदस्याचे सत्कार केला. आगरनांदुर हे धरणग्रस्त गाव असल्याने या गावच्या विकासाकडे आजपर्यंत दुर्लक्ष होत गेले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आता नक्कीच विकास करणार सल्याचे थोरात यानी सांगितले. आगरनांदुरमधुन निवडून आलेले विजयी सदस्य मनोहर जनार्दन थोरात, मंगल शशिकांत केसभट, कमलाबाई तुकाराम थोरात, संजय केशव थोरात, अमिनाबी चॉद शेख, आरती नामदेव खडसन, जालिदर शांतवण गायकवाड, अमृता दिपक गंगावणे.



# ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या वतीने मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या साप्ताहिक कार्यक्रमात गुरुवारी ४ ऑगस्ट रोजी पाऊस व श्रावणातील सण ही थीम घेऊन "स्वर श्रावण" हा मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम कलारंग ग्रुपच्या गायिका सारिका विलास कुलकर्णी व अपर्णा मिलिंद देशपांडे आणि सह कलाकार यांनी सादर केला. मिलिंद डोलारे यांनी सिंथेसायजरवर, शरद दांडगे यांनी तबल्यावर व राहुल जोशी यांनी ऑक्टोप्याडवर साथ सांगत केली. अध्यक्षस्थानी भरत कुलकर्णी होते. अशोक पाध्ये, शिवकुमार पाडळकर, प्रमोद बेंडे, प्रमोद सुरडकर व संस्थेचे सभासद मोठ्या संखेने उपस्थित होते. सारिका विलास कुलकर्णी यांचे स्वागत भरत कुलकर्णी यांनी केले. इतर कलाकारांचे स्वागत विभा श्रीवास्तव, रेणू मुळे, चित्रा पिलखाने, प्रेमचंद तुल्ले व श्रीकांत पत्की यांनी केले.

कार्यक्रमाची सुरवात निवेदिका वैशाली धामणगावकर यांनी बालकवी त्र्यंबक बापुजी ठोमरे यांच्या "श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे" ह्या कवितेने केली. कवीने प्रस्तुत कवितेत श्रावण महिन्यातील निसर्गश्रुष्टीचे विलोभनीय व सुंदर वर्णन केले आहे. सुरुवातीस अपर्णा देशपांडे यांनी "अशी चिक्क मोत्याची माळ" ह्या श्री गणेशाच्या गीताने केली. त्यानंतर त्यांनी वो वो सजना बरखा बहार आयी, इत्त्यादी गीते सदर केली. सारिका कुलकर्णी यांनी संत ज्ञानेश्वरांचे रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा सांडी तू अवगुणु रे भ्रमरा, जगाच्या पाठीवर सिनेमातील ग दि मा यांचे नाच नाचुनी अति मी दमले थकलेरे नंदलाला, श्रेया घोषाल यांनी गायिलेले अधीर मन झाले मधुर घन आले, अनपढ सिमेमातील जिया ले गयो जी मोरा सांवरिया, इत्त्यादी गीते आणि विलास कुलकर्णी यांनी लिहिलेले व सारंग पाडळकर यांनी संगीत बद्ध केलेले "बरसल्या बरसल्या श्रावण सरी", हे गीत सादर करून प्रेक्षकांच्या टाळ्या मिळविल्या.

सारिका कुलकर्णी, अपर्णा देशपांडे व अश्विनी शहाणे यांनी नागपंचमीनिमित्त वारुळाला जाऊ चला नागोबाला पाहू, आला आला वारा संगे पावसाच्या धारा, इत्त्यादी समूह गीते सादर केली. सारिका कुलकर्णी व कोरस यांनी गायिलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या "हे हिंदू नृसिहा प्रभो शिवाजी राजा" या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. विभा श्रीवास्तव यांनी आभार प्रदर्शन केले.

# अवैध धंदेवाल्यांची गय केली जाणार नाही : सपोनि शिंदे

## पिशोर पोलिसांनी 13 जुगारांसह मोठ्या प्रमाणात अवैध देशी दारू पडकली

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** तालुक्यातील पिशोर पोलिसांनी धडाकेबाज कार्यवाही करण्यास सुरवात केली आहे. नागपंचमीच्या मुहूर्तावर जबरदस्त कारवाई करत अवैध दारू विक्रेते आणि जुगार अड्ड्यांवर कारवाई करत १३ जणांना अटक केली.

करंजखेड येथील गोकुळ भीमराव उपळकर यांच्याकडून ४८ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या किंमत ४३२० रुपये, नाचनवेल फाट्याजवळ शिंदे पेट्रोल पंपाच्या बाजूस संतोष धनराज गोंगे व काकासाहेब तुकाराम शिंदे दोघे रा. सावखेडा ता. सिल्लोड यांच्याकडून मोटरसायकलसह ४० सीलबंद देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. तसेच बरकतपूर येथे विनापरवाना बेकायदेशीररित्या झन्ना - मन्ना नावाचा जुगार खेळत असलेल्या ठिकाणी छापा टाकून आरोपी शाहरुख मोहम्मद शहा, बाळू शेनफडू मोरे, कौतिक राधाकीसन भुजंग, श्रीरंग किसन भोले, प्रभूधनराज मोरे, सर्व रा. बरकतपुर ता. कन्नड या आरोपींना ताब्यात घेत त्यांच्याकडून मोबाईलसह रोख ५०३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला तर पिशोर येथील शफेपुर भागातील पुंडलिक सीताराम मोकासे, बापू रामराव मोकासे, अंकुश हरी मोकासे, संतराम किसाजी डहाके, सर्व रा. शफेपूर पिशोर हे गणेश सुदाम मोकासे यांच्या चिकूच्या बागेत झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळताना आढळून आले. यांच्याकडून रोख रक्कमसह पाच मोटरसायकल असा एकूण २०२९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



कन्नड उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद अघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि कोमल शिंदे यांनी ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे पथक नेमून विविध ठिकाणी छापेमरीत उतुंग कामगिरी करीत ४२९२० रुपये किंमतीची अवैध दारू तर जुगार खेळणाऱ्या इसमांकडून २५३२४० रुपये किंमतीचा रोख, पाच मोटरसायकल व मोबाईल हस्तगत करीत एकूण २ लाख ९६ हजार १६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील पथकात ठाण्यातील कर्मचारी दबंग बिट जमादार किरण गंडे, लालचंद नागलोत, सोपान डकले, संजय लगड, चव्हाण, विलास सोनवणे, सपकाळ, अन्सार पटेल, कमात, सुनील जाधव, बहुरे, भिवसने, गणेश कव्वाल, म्हस्के, घुगे यांचा समावेश होता. तसेच सपोनि श्रीमती शिंदे यांनी माहिती दिली की, परिसरात अवैध धंदे चालवणाऱ्यांची गय केली जाणार नाही तसेच कायदाचा भंग केल्यास कड़क कार्यवाही केली जाणार, पोलिसांची कार्यवाही सुरु असल्याने अवैध धंद्यावाल्यांचे ढाबे दाणाणले असल्याचे चित्र पिशोर परिसरात पहावयास मिळत आहे.



# शाळा सुटली-पाटी फुटली



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**डोळ्यात तेल घालून जागणं किंवा रक्ताचं पाणी करून शिकणं या बाबी मोबाईल हाती आलेल्या पिढीच्या दृष्टीने कालबाह्य झाल्या आहेत. यशस्वी होण्यासाठी शाळा कॉलेजमध्ये नियमितपणे जाण्याची गरजच काय? हा त्यांचा प्रश्न. आज शासन शाळाबाह्य मुलांसाठी देखील ते प्रवाहात यावेत, शिक्षणाच्या संधीपासून वंचीत राहू नयेत म्हणून प्रयत्न करत असताना ज्यांचा दाखला शाळा-कॉलेजमध्ये आहे, त्यांना शिक्षणासाठी तिकडे फिरकावेसे वाटू नये, हे दुर्दैवी आहे. त्याला एक ना अनेक कारणे आहेत. कारणांच्या तपशिलात गुणवत्तेचा पाचोळा होत आहे, याकडे समाजाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.**

दहावी-बारावीपर्यंत कसेतरी मुले नियमित शाळेत येतात, पण उच्चशिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एवढा कलुषित झाला आहे की, कॉलेजला जाऊन काय करायचे? हा त्यांचा हमखास प्रश्न असतो. कारण आपण नियमित गेलो काय किंवा नाही गेलो तरी उत्तीर्ण तर होणारच आहोत, ही शाश्वती आहे. ही धारणा पक्की होण्यामागे काही प्रमुख कारणे आहेत. महत्त्वाचे कारण म्हणजे शाळा-महाविद्यालयाची वाढलेली संख्या. या वाढीव संख्येचा परिणाम असा झाला की, अक्षरशः विद्यार्थ्यांनी आपल्याकडे प्रवेश घ्यावा यासाठी रस्सीखेच सुरू झाली. प्रवेशासाठी वेगवेगळी प्रलोभने निर्माण झाली. त्यातले एक प्रलोभन म्हणजे नियमित न येताही पासची हमी. सर्वत्र नकलांचा सुळसुळाट आहे असेही नव्हे, पण त्याचे प्रमाण मात्र वाढले आहे. कायम विनाअनुदानित महाविद्यालयाच्या संख्येमुळे मुळातच उच्च शिक्षणात आस्था नसलेल्या समाजात कमालीची स्पर्धा निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर शिक्षकांच्या नोकरीचा संबंध असल्यामुळे विद्यार्थी कमी झाल्यास आपल्यावर गंडांतर येऊ शकते, ही भीती शिक्षकांच्या मनात भरली गेली. त्याचा परिणाम असा झाला की, आपली नोकरी वाचवायची असेल तर, काही झाले तरी पटसंख्या कमी होता कामा नये. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जवळपास सहाशे महाविद्यालये होती ती संख्या आज बेचाळीस हजाराच्या पुढे आहे. ही अभिनंदनीय गोष्ट असली तरी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीची अपेक्षा असणाऱ्यास आपण नोकरी देऊ शकलो नाहीत, हे मात्र खजिलपणाचे वाटत नाही. कॉपी प्रकाराला आळा घालण्याचा एकमेव उपाय म्हणजे सुशिक्षितांना नोकरीची संधी उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थी-शिक्षक संबंध पटसंख्येशी न जोडणे. आपण कितीही आदर्शवादाच्या गप्पा मारल्या तरी ज्यांना नोकरीची हमी नाही, लागली तरी अमक्याचा संबंध तमक्याशी जोडला की मग अमका हा तमका कसा शाबूत राहील यावरच जास्त लक्ष देणार, हे नैसर्गिक आहे.

माध्यमिक शिक्षण आयोग, विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण मंडळ, कोठारी




आयोग, मुदलियार आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे या सर्वांच्या तळाशी तळागाळापर्यंत शिक्षण गेले पाहिजे, हा भाग असला तरी समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटले पाहिजे. हे महत्त्व तेव्हाच पटेल जेव्हा या शिक्षणाचा त्यांच्या चरितार्थासाठी उपयोग होईल. कोणी शिकून जर बेरोजगार राहत असेल तर समाजावर तो प्रभाव टाकणारच. शिक्षणाबाबत एकप्रकारची नकारात्मक भावना निर्माण होण्यात अनेक कारणांसोबत सुशिक्षितांची बेरोजगारी हेही एक महत्त्वाचे कारण आहे. शिक्षणातून ज्ञान मिळणे महत्त्वाचे असले तरी कौशल्य विकसित होणे हे देखील गरजेचे आहे. सांप्रत शिक्षण व्यवस्थेवर एक आक्षेप नेहमी घेतला जातो, तो म्हणजे ही व्यवस्था फक्त कारकून तयार करणारी व्यवस्था आहे. मग ती कौशल्याधारीत कशी निर्माण करता येईल, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. राजीव गांधी सरकारच्या शैक्षणिक धोरणानंतर (१९८६-८७)अलीकडे जे नवीन शैक्षणिक धोरण (२०१९) आले त्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात कौशल्याधारीत शिक्षणावर भर दिल्याचे दिसून येते. १९८६ च्या धोरणानुसार व्यावसायिक आणि तांत्रिक प्रवेश परीक्षेची प्रक्रिया एकसमायिक करून बराच बदल केला होता. त्याची पुढची अवस्था म्हणून २०१९ च्या शैक्षणिक धोरणाकडे पाहिले पाहिजे. कारण नवीन शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. प्रचंड क्षमता असूनसुद्धा भारतीय तरुण व्यवसायात मागे पडत असेल तर एक धोरण म्हणून त्यास प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. हे ओळखून या धोरणात व्यवसाय प्रशिक्षणाचा अंतर्भाव केला गेला ही मोठीच उपलब्धी म्हणावी लागेल. कारण जगात जपान-८०, जर्मनी-७५, इंग्लंड-५८, अमेरिका-५२, चीन-२४ टक्के कौशल्याधारीत औपचरिक शिक्षण देतात तर भारतात आज हेच प्रमाण फक्त २.२ इतके आहे.येणारा काळ हा शाळा कॉलेजात येऊन पाट्या टाकण्याचा किंवा दांड्या मारण्याचा नसेल. शिक्षित तरुणांच्या हाताला काम मिळाले तर त्यातून देशाचा विकास होईल आणि खऱ्या अर्थाने भारत भाग्यविधाता होऊ शकतो. आजही आपल्याकडील जवळपास वीस टक्के पुरुष आणि छत्तीस टक्के स्त्रिया निरक्षर असतील तर विकासात अडथळे निर्माण होणारच.

## बोंबाबोंब कशासाठी?

**तुमचा वेळ आणि आई-बापाचा पैसा विनाकारण वाया जाऊ नये असे वाटत असेल तर नियमित अभ्यास करा. तसेही आपणास असे काही वाटत नाही, हा भाग वेगळा. जे विद्यार्थी आज चार पैसे कमावतात त्यांना आजच्यापुरते बरेही वाटण्याचा संभव आहे, पण यातच तुमचे आयुष्य जाईल त्याचे काय? शिक्षण तुम्हाला अनेक संधींचे दारं उघडण्यास मदत करते, संधींचे सोने करा. नवीन शैक्षणिक धोरणात तुम्ही नियमित न येता कॉप्या करून किती गुण मिळविले याला काहीएक अर्थ उरणार नाही. तुमच्यात काय आणि किती कौशल्य आहे, यावर तुमची संधी निर्धारित असेल. तेव्हा वेळीच जागे व्हा.**

विद्यार्थी मित्रानो, येणारा काळ हा कागदावर किती गुण आहेत हे पाहण्याचा नसेल तर तुमच्यात किती गुण आहेत आणि तुम्ही त्याचे उपयोजन कसे करणार आहात हे पाहण्याचा असेल. तेव्हा शाळा-कॉलेजला दांड्या मारून व परीक्षेत कॉप्या करून पास होण्यात आता काही अर्थ उरणार नाही, हे लक्षात ठेवा व अभ्यासाला लागा.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# "मैत्री "वर बोलू काही....



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**बंधना पलीकडे एक नाते असते. शब्दाचे त्याला बंधन नसते. दुःखाला तिथे थारा नसतो आणि गोडवा मैत्रीत असतो. जागतिक स्तरावर 30 जुलै रोजी मैत्री दिवस म्हणजेच फ्रेंडशिप डे साजरा केला जातो, परंतु भारतात ऑगस्टमध्ये येणाऱ्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस साजरा केला जातो. अर्थात आज आपण तो साजरा करत आहोत. "फ्रेंडशिप डे" अर्थातच मैत्री दिवस. हा संपूर्ण जगात उत्साहात साजरा केला जातो, कारण असा एखादाच कोणी माणूस असेल ज्याला मित्र नाही, आणि ज्याला मैत्रीचे महत्त्व ही माहीत नाही. आपल्या सर्वांच्या आयुष्यात कमी किंवा अधिक प्रमाणात मित्र असतात, मित्रांसमवेत घालवलेला वेळ कोणास आवडणार नाही. विशेषतः बालपणातील मैत्री खूप घट्ट असते. ज्याची आठवण कायमची मनात राहते. मैत्रीच्या नात्यात जात धर्म वगैरेला महत्त्व नसते आणि त्याचा अडथळे नसतो त्या नात्याला एक खास ताण आहे.**


मैत्री एक असं नातं आहे ज्याला एखादी व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार निवडतो. बालपणात नकळत बरेच मित्र बनून जातात. ज्यामध्ये काही मित्र असेही असतात जे शाळेपासून ते कॉलेजपर्यंत साथ देतात तर काही चांगल्या आणि वाईट काळात देखील आपली मैत्री निभावतात. तथापि असे मित्र फारच कमी असतात जे आयुष्यभर आपली मैत्री जपतात. म्हणून मैत्री करताना आपण सावध असायला हवे. आपण सहजच म्हणत असतो -"समान गुणे व्यसनेशुच् सख्यम्"
मित्र असे असतात ज्यांचा सहवास आपल्या वर्तमान आणि भविष्यावर प्रभाव टाकत असतात . वाईट सवय असलेल्या मित्रांचा सहवास आपल्याला आणि आपल्या भविष्याला खराब करतात, तर चांगली विचारसरणी आणि चांगल्या सवयी असलेले मित्र आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि आपल्या जीवनाला सुशोभित करण्यास मदत करतात. आजकाल मित्रांना अनेक वर्गात विभागले आहेत जसं की एक सारखा छंद जोपासणारे मित्र, व्यवसायी मित्र, कामाच्या ठिकाणचे मित्र, इत्यादी पण जे खरे मित्र असतात त्यांची आवड निवड एक सारखी असते. ते आपल्याला आयुष्याचा पदोपदी साथ देतात ते नेहमीच आपल्या चांगल्याचा विचार करतात.

आपल्या आयुष्यात देखील असा कोणी खरामित्र असेल तर त्याला मैत्री दिनाच्या या खास प्रसंगी आपल्या त्या खास मित्राला तो खास असल्याची जाणीव नक्कीच करून देत असतो. हा दिवस आपल्या जिवलग मित्रांसह साजरा केले जातो. बरेच लोकं हा दिवसआपल्या मित्रांसह साजरा करण्यासाठी विविध योजना आखून हा दिवस साजरा करतात. संपूर्ण दिवस जरी नाही तरी जेवढे शक्य असल्यास आपल्या व्यस्ततेमधून काही क्षण आपल्या मित्रांसाठी नक्की काढतो,वा काढावे. या दिवशी मैत्रीचे निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक धागे,शुभेच्छापत्र,आता काही वर्षांपासून वॉट्सऍप वर शुभेच्छा संदेश, फेसबुकवर संदेश दिले जातात.
एकत्रित भोजनाचे बेत आखले जातात.
एकमेकां पासून दुर असतील तर फोन वरुन बोलून जवळीक साधली जाते. भारतात मैत्री दिवस ऑंगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा करतात. अमेरिकेत सरकारने एका माणसाला ठार मारले. त्याचा एक मित्र होता,त्याला मित्राचे मरणाचे दुःख झाल्याने जीवन संपवले.त्याच्या स्मरणार्थ हा दिवस १९३५ पासून मित्रता दिवस "फ्रेन्डशिप डे" साजरा होऊ लागला.

मैत्री कशी असते ह्या विषयीच्या दोन गोष्टी बघा, घट्ट मैत्री कशी असते....

जेव्हा छ.शिवाजी महाराजांनी किल्ले हाती घेण्याची मोहीम चालवली तेव्हा प्रत्येकवेळी तानाजी आघाडीवर होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक शूरवीर असतानाही जेव्हा कोंडाणा जिंकून आणण्याची वेळ आली तर महाराजांच्या मनात एकच नाव होते ते म्हणजे तानाजी मालुसरे. इतिहासातील हे युद्ध सिंहगडची लढाई म्हणून नोंदवले गेले आहे. तेव्हा ते कोंडाणा म्हणून ओखळले जात होते. शिवाजी महाराजांचे परममित्र तानाजी मालसुरे आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत व्यस्त असताना हे सर्व घडले होते. कोंडाणा किल्ल्यासह 23 किल्ले पुरंदर करारामध्ये मुघलांना सोपविल्यानंतरही मोगल सल्तनत तहान भागली नव्हती. औरंगजेबाने आपला विश्वासू उदयभानु राठोड यांना कोंडाणा किल्ल्याकडे पाठवून मराठा साम्राज्य नष्ट करण्याचा नेम धरला होता.तेव्हा शिवाजी महाराजांना आपल्या शूर व प्रिय मित्राला युद्धाच्या घटनेत सामील करायचे नव्हते, कारण तानाजीच्या घरी लग्नाची तयारी सुरु होती. पण स्वराज्य आणि शिवाजी महाराजावर संकट आल्याचे कळले तर तानाजींनी मुलगा रायबाच्या लग्नाची पर्वा न करता भगवा परिधान केला. अत्यंत कठीण प्रसंगी राज्यासाठी कामास येण्यापेक्षा मोठे भाग्य काय असावे असा विचाराने तानाजींची छाती गर्वाने फुलून गेली.आधी लग्न उरकून घेऊ, मग कामगिरीसाठी निघू असे शेलार मामांनी म्हटल्यावर तानाजींनी उत्तर दिले की "आधी लगीन कोंढाण्याचे मग लगीन रायबाचे". तानाजी जिजाऊंना भेटून रायबाची जबाबदारी शिवाजी महाराजांच्या हाती देऊन म्हणाले की कोंढाण्याहून परतलो तर मी मुलाचे लग्न लावेन आणि जर मेलो तर तुम्ही त्याचे लग्न लावून द्या.

४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली राजगडावरुन मराठा सैन्य निघाले. आपले प्राण पणाला लावून कोंडाणा ताब्यात घेतला. महाराजांना विजयाची बातमी कळताच आनंद झाला पण तानाजींनी प्राण गमावले कळताच त्यांचे अश्रु अनावर झाले आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघाले- गड आला पण सिंह गेला...



मित्र म्हणजे असा घागा,
मोकळं व्हावं अशी जागा,
कोणतच नाटक नाही....
प्रत्येकाच्या आयुष्यात असे मित्र मैत्रिणी असतातच.. तर असाच एक मित्र म्हणा, मैत्रीण म्हणा आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आहे! कोण बरं?? तर ते म्हणजे पुस्तक! पुस्तकाशी मैत्री. ही पुस्तके लहानपणापासून तर शेवट पर्यंत बाल साहित्यापासून तर भगवद् गीतेपर्यंत साथ देणारी ही जिवाभावाचे मित्र- मैत्रीण! आपल्या एकटेपणात आपला साथ देणारी...अजून...

मैत्री हा शब्द आठवताच प्रथम डोळ्यांसमोर उभी राहते ती कृष्ण-सुदामा यांची मैत्री. महाभारताच्या काळातली ही मैत्री. पण भारताच्या इतिहासात ती अमर होऊन बसली. कृष्ण श्रीमंत होता; तर सुदामा गरीब होता. कृष्ण देखणा, बलवान; तर सुदामा हडकुळा, खंगलेला आणि रूपाने सामान्य. पण दोघांची घनदाट मैत्री झाली. सांदिपनी ऋषींच्या आश्रमात गुरुगृही दोघेही शिक्षण घ्यावयास आले. त्या आश्रमात त्यांची इतकी मैत्री झाली की, एकमेकांशिवाय एकमेकांना चैन पडायचे नाही. कृष्ण मनानं इतका मोठा, इतका उदार की त्याने आपला मित्र एक दरिदी भिक्षुक ब्राह्मण आहे याचा कधी विचारही केला नाही.

आश्रमातले दिवस संपले. पुढे श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला. सुदाम्याच्या कानी त्याची कीतीर् साहजिकच पडली. त्याला कृष्णाला भेटावयाची, बघावयाची इच्छा झाली. तो द्वारकेला आला. राजवाड्याच्या दाराशी भीत भीत उभा राहिला. पहारेकरी ओरडले. त्याला आत जाऊ देईनात. कृष्णाने विचारले 'कोण आहे रे तिकडे?' सुदामा थरथर कापत म्हणाला, 'मी सुदामा...' सुदामा हे नाव कानी पडताच कृष्ण धावत आला आणि त्याने सुदाम्याला कडकडून मिठी मारली. प्रेमाने आत नेऊन आपल्या सिंहासनाशेजारी बसवले आणि विचारले, 'काय भेट आणलीस माझ्यासाठी?' सुदाम्याने लाजत लाजत अंगावरला पंचा पुढे केला. त्यात पोह्यांची पुरचुंडी होती. कृष्णाला आवडणारे पोहे सुदाम्याने आठवणीने त्याच्यासाठी आणले होते. कृष्णाने अधाश्यासारखे ते पोहे खाल्लेत. त्याच्या हृदयात गहिवर दाटून आला. डोळ्यात पाणी उभे राहिले. म्हणाला, 'सुदामा, किती रे तुझे माझ्यावर प्रेम. अरे, मला पोहे आवडतात हे लक्षात ठेवून तू प्रेमाने मला पोह्यांची भेट दिलीस!'
कृष्ण-सुदाम्याच्या मैत्रीची ही कथा! पण तिचे नुसते स्मरण झाले तरी डोळ्यात पाणी येते. दोन व्यक्तीं मध्ये मैत्रीची भावना केवढी महान असू शकते हे ही कथा सिद्ध करते. खरोखर, मैत्री किती श्रेष्ठ आहे. प्रत्येक माणसाला मित्र हा हवाच ! पुरुषाला मित्र आणि स्त्रीला मैत्रीण म्हणजे एक आधार असतो. सुप्रसिद्ध लेखिका विभावरी शिरुरकरांनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की शंभर मैत्रिणींपेक्षा स्त्रीला एक पुरुष मित्र अधिक आवडतो ! तर.....
पु.ल.देशपांडे म्हणतात,
"मैत्रीची सोपी व्याख्या आहे.
रोज आठवण यावी असं काही नाही
रोज भेट व्हावी असं काही नाही
एवढेच कशाला रोज बोलणं व्हावे असंही नाही
मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री
आणि तुला याची जाणीव असणं
ही झाली मैत्री...
ज्याच्याजवळ मनातील भाव व्यक्त करता येतात ते व्यक्त करताना संकोच वाटत नाही आणि त्यात खोटेपणा नसतो किंवा फसवा फसवी नसते ज्याच्याजवळ आपण आपली गुपित अतिशय मोकळेपणाने उघडे करतो आणि एकमेकांच्या सुखदुःखाची एकरूप होऊन जात असतो अशा भावनेलाच किंवा अवस्थेला मैत्री म्हणतात आणि जो ते निभवतो तोच खरा मित्र .अशी एक मैत्रीची व्याख्या आहे. खरा मित्र असतो तो नेहमीच योग्य अशा गोष्टी करण्याचा सल्ला देत असतो. एकमेकांच्या प्रगतीची आणि समृद्धीसाठी एकमेकासाठी प्रयत्न असणे तसेच आनंद असणज हीच मैत्री आहे.
असा मैत्रीचा धागा जपू या....
सर्वांना मैत्री दिवसाच्या शुभेच्छा !

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भारतीय राजकीय क्षेत्र कधी शुचिर्भूत होणार



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**सर्वच पक्षात भ्रष्टाचारी आहेत कमी अधिक प्रमाणात. परंतू ईडी काय किंवा सीबीआय काय कोणीतरी तक्रार केली, माहीती पुरवली तरच कारवाई करणार ना. आपले कडे अजून तरी आपले हेर खाते गैरव्यवहार शोधून काढून त्याची माहीती सरकारला देते असे होत नाही. मग जिथे जळते तिथुनच धूर निघतो किंवा जळाल्याचा, करपल्याचा वास येतो ना तसे किरीट सोमय्या सारखे उच्चशिक्षित कार्यकर्ते सखोल माहीती काढून, पुराव्यांसह आरोप करतात म्हणून या लोकांवर कारवाई होते आहे. यात सुड वगैरे काही नसून शुध्दीकरण प्रोसेस चालू आहे असे समजावे.**

राजकारणात कोणीच धुतल्या तांदळाचे असत नाहीत. पक्ष चालवणे आणि आमदार, खासदार, कार्यकर्ते, पदाधिकारी,सांभाळणे महाकठीण काम असते. आज सर्वच जग फक्त पैशांभोवती फिरत आहे. ज्याचे जीवनात संस्कारापेक्षा, संस्कृती पेक्षा पैसा, द्रव्य, धन, संपत्ती, मालमत्ता, बॅंकबॅलेन्स याला महत्व आहे तेथे नितीमत्ता, नियत, कर्म, सभ्यता, सज्जनपणा, पेंड खातात. आणि मग प्रत्येक बाब पैशांभोवती फिरत राहते. पैसा हे साधन आहे, साध्य नाही. हे कळायला अख्खे आयुष्य, जीवन खर्ची घालावे लागते. जीवन जगण्यासाठी लागणारा पैसा कमवायलाच हवा, त्यात कांहीच गैर नाही. परंतू हव्यास, लालूच, अतिरेकी अपेक्षा, लोभ, मग त्यापायी वाममार्ग हाताळणे वाईटच.

आपले जीवन सुस्थितीत जगा, पुढच्या पिढीला लायक, कणखर, आणि कर्तुत्ववान बणवा, पण त्यांचे भविष्यासाठी काळेधन गोळा करून ठेवण्याच्या नादी लागू नका हे कळायला हवे. अतिरिक्त पैसा आणि त्याचा ऊथळ वापर नंतर ची पिढी बिघडवतो. वाया घालवतो. सर्व सहज, सुलभतेने मिळत गेले की, आणि फूकट मिळणाऱ्या सोयी सुविधा मुळे त्यांचे मोल, मातीमोल होते. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांना भ्रष्ट मार्ग दूर ठेवता येत नाहीत. एका क्षणी सर्व थांबवून यु टर्न घेता येत नाही. ट्राफिक, सिग्नल यांचा अंदाज घ्यावाच लागतो हे सत्य नजरे आड करता येत नाही. तरीही भारतीय स्वातंत्र्य प्राप्ती नंतर झालेली लयलूट, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, चूकीचे पडलेले पायंडे हे कधीतरी कोणाला तरी संपवावेच लागणार आहेत ना.

देशाची कॉंग्रेसने धर्मशाळा, वसतीगृहे करून टाकलीत. कोणीही येतो आणि येथे वसतो. त्याचा खर्च, लांगूलचालन करण्यात कर दात्यांचा कष्टाचा पैसा वाया जात आहे. त्यामुळे भारतीय समाजात नकारात्मक विचारांचा पगडा वाढला आहे. मी देशाचे काही देणे लागतो, देश सुरक्षित तर आपले जगणे, संपत्ती सुरक्षित हे विसरूनच राजकारणी स्वार्थ बघतात. सामान्य नागरिक अनुकरण करतात. तोच पैलू भारताचा घात करत आहे. ईडी, सीबीआय वगैरे तपास यंत्रणा त्यांचे काम करत आहेत. परंतू जागृती आणि सजगता वाढल्याने त्याचा गवगवा वाढला आहे. म्हणून नकारात्मक प्रचार होत आहे.

नरेंद्र मोदी सरकार फक्त विरोधी पक्षाचे नेत्यांनाच टारगेट करत आहेत. ही बोंब गलत आहे. चुकीची आहे. आज भारतीय राजकारणात सर्वात जास्त काळ कॉंग्रेस सह घराणेशाही राबवणारे, घराणेशाही चे पुरस्कर्ते सत्तेत होते. आणि कॉंग्रेस संस्कृतीच भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणारी असल्यानेच कॉंग्रेस मधून फुटून आपापल्या घराण्याचे प्रायव्हेट पक्ष काढले गेले. आणि विविध राज्यांमध्ये ते सत्तेत येऊन आपल्याच नात्यागोत्यातील लोकांना सत्ता पदे देत गेले, त्यामुळे साहजिकच जी कांही भ्रष्ट व्यवहार, प्रकरणे, कांड, प्रलोभने, गैरव्यवहार, उघड होत आहेत ते विरोधकांचेच मोठ्या प्रमाणात निघत आहेत. बरे नरेंद्र मोदी सरकार सुडबुध्दीने जाणिवपूर्वक करत आहे म्हणावे तर एकही विरोधीपक्ष नेता कोणत्याही भाजपायी नेत्याविरोधात ठोस आरोप करत नाही आहे. संजय राऊत यांनी किरीट सोमय्या आणि कुटूंबात विरोधात कांही बिनबुडाचे आरोप केले, परंतू सोमय्यांचे पत्नीने बदनामी चा आणि नुकसानभरपाईचा दावा दाखल केला तर माफि मागून माघार घ्यावी लागली राऊतांना. ईकडे पक्षात बंड होताच उध्दव ठाकरेंनी विश्वासदर्शक ठरावाला सामोरे न जाता राजिनामा देणे पसंत केले. आणि तेंव्हा विधान परिषदेचे आमदारीकेचे पदही सोडल्याचे जाहीर केले परंतू वास्तविक त्यांनी आमदारकी सोडलेली नाही. हे लोक जनतेची दिशाभूल करत मतदारांना मुर्ख समजतात. त्यामुळे आज तरी विरोधकांवरच ईडीची आणि सीबीआय ची कारवाई होताना दिसत आहे. यात भाजपात गेलं की पवित्र असे काही होत नाही.



सर्वच पक्षात भ्रष्टाचारी आहेत कमी अधिक प्रमाणात. परंतू ईडी काय किंवा सीबीआय काय कोणीतरी तक्रार केली, माहीती पुरवली तरच कारवाई करणार ना. आपले कडे अजून तरी आपले हेर खाते गैरव्यवहार शोधून काढून त्याची माहीती सरकारला देते असे होत नाही. मग जिथे जळते तिथुनच धूर निघतो किंवा जळाल्याचा, करपल्याचा वास येतो ना तसे किरीट सोमय्या सारखे उच्चशिक्षित कार्यकर्ते सखोल माहीती काढून, पुराव्यांसह आरोप करतात म्हणून या लोकांवर कारवाई होते आहे. यात सुड वगैरे काही नसून शुध्दीकरण प्रोसेस चालू आहे असे समजावे.

नरेंद्र मोदी, अमित शाह, नितिन गडकरी, राजनाथसिंह सारख्या कार्यक्षम नेत्यांवर गेल्या आठ वर्षात एकही आरोप विरोधक करू शकले नाहीत हे स्पष्टच आहे. त्यामुळे गुन्हेगार कोणीही असो त्याची चौकशी व्हायलाच हवी.

आणखी एक या चौकशी साठी निरापराधीला कोणीही बोलावत नाही. ईडी ला सकृतदर्शनी पुरावा दिसला, तक्रारीत किंवा माहीतीत कांही तथ्ये आढळलीच तरच ते चौकशीसाठी बोलावतात. त्यामुळे अशा गुन्हेगारांचे समर्थनार्थ मोर्चे काढणे, रास्तारोको करणे, रेल बंद आंदोलन करणे गैर आहे. बरोबर नाही.

याचा अर्थ आपण गुन्हेगारांना सहकार्य करत आहोत, पाठिंबा देत आहोत, कायद्यात अडथळे आणून सरकारी कामकाजात आणि चौकशी संस्थांचे कार्यात हस्तक्षेप करत आहोत असे होते.

ते निर्दोष सुटले किंवा निघाले तर जरूर त्यांचा उदोउदो करा परंतू चौकशीला विरोध करू नका. कर्मभोग कोणालाच चुकवता येत नाहीत. त्याची फळे भोगावीच लागतात. त्यामुळे गुन्हा करणाऱ्या सोबत त्याला सहाय्य करणारेही दोषी ठरत असतात हे कायम लक्षात ठेवावे.

तुकारामनीती
भाग 19

# अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारु अल्ला खिलावे



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**सामान्य माणसांसोबत राहून तूकोबांनी समाजमन आणि समाजाची नाडी चांगल्याप्रकारे ओळखली होती. संत तुकारामांची सामान्य लेकरू, तरुण, माणूस आणि जीवनातील घाव, धक्के, प्रसंगी प्रस्थापितांचा मार खाऊन एक महापुरुष, संतत्व अंगी उतरण्यापर्यंतची वाटचाल मोठी आव्हानात्मक आणि खडतर असणार यात कुणालाही तिळमात्र शंका नसावी ! आपले लौकिक व्यवहार, भोवताल चालणारा समाजाचा बाजार, त्यात होणारी त्यांची जडणघडण आणि ससेहोलपट यावर बारकाईने चिंतन केले असता त्यांनी काय काय सोसले नसेल (?) याची कल्पनाच न केलेली बरी ! त्यांचे अभंग म्हणजे त्यांनी समाजाच्या सर्वच अंगांचे केलेले दूरगामी आणि सार्वकालीन निरंतर चिंतन आहेत. ते सहज किंवा लिहायचे म्हणून लिहित नसावेत, कारण "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म" असं जगजाहीरपणे ओरडून सांगत असतांना हिंदू-मुस्लीम किंवा ईश्वर-अल्लाह हा अमंगळ भेदाभेद-भ्रम त्यांच्या ठाई असणे कसेच शक्य नाही ! परिणामी त्यांना विठ्ठल काय किंवा अल्लाह काय ? हे दोन्ही प्रतीकं समानच ! त्यांचे द्वैताद्वैत केंव्हाच संपले असल्याकारणाने ते या दर्जाचे अभंग लिहू शकले !**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत सतरावे शतक अत्यंत महत्वाचे मानले जाते, त्याचे कारण म्हणजे येथील मराठी माणसाची अस्मिता जागे करण्याचे महत्कार्य शहाजी राजे भोसले व त्यांच्या सुविद्य पत्नी जिजाऊ आईसाहेब यांचे सुर्यासमान तेजस्वी सुपुत्र छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेचा दैदिप्यमान कालखंड ! हाच काळ संत तुकारामांचा सुद्धा ! यवनांच्या भारतातील घुसखोरी आणि आक्रमणापूर्वी महाराष्ट्रांत हिंदू-मुसलमान गुण्यागोविंदाने नांदत होते याची शेकडो उदाहरणे देता येतील. महाराष्ट्राच्या मातीला धार्मिक कट्टरतेची कीड तेंव्हा लागली नव्हती, परिणामी मुसलमानांच्या अनेक दर्ग्याच्या वाऱ्या आणि पंगती इथले हिंदू घालायचे तर मुसलमान बांधव पंढरपूरची वारी करायचे ! याचा दाखला म्हणजे सोळाव्या शतकांतील, बीड जिल्यातील आष्टीचे मुसलमान संत शेख महमद महाराजांचे अनेक अभंग आजही कीर्तनातून गाईले जातात.

निट बसा डोळे पुसा । घातला पवसा झोपेने ॥1॥
कर्णबिळि वैसलि टाळि ॥ नाम नव्हाळि ऐको नेंदि ॥ 2 ॥
कानि बोंब मारा सावद करा । नाम उपचारा सेख महमद म्हणे ॥3॥
(शेख महमंद गाथा अभंग क्र.7)

याचाच अर्थ मुसलमान सुद्धा वारीला येत असत आणि संदल किंवा अन्य मुसलमानांच्या मिरवणुकीत हिंदू सहभागी होत असत. हीच धर्मसहिष्णुता नंतर छत्रपती शिवरायांनी सुद्धा आपल्या साम्राज्यात जपली हे अधोरेखित करणे तेव्हढेच क्रमप्राप्त ठरते. त्याचप्रमाणे सोळाव्या शतकांत उत्तरेत जन्मलेले संत कबीर सुद्धा वारकऱ्यांचे पूजनीय संत मानले जात असून त्यांनी सुद्धा ईश्वर-अल्लाह यात कोणताही भेद नसून केवळ नावे भिन्न आहेत, तत्व मात्र एकच आहे ! याचे अनेक दोह्यात प्रतिपादन केलेले आढळून येते. त्यांनी सर्वच भेद या खालील दोनच ओळीत मिटवून टाकलेले दिसतात.

हिन्दू मुस्लिम दोनों भुलाने, खटपट मांय रिया अटकी ।
जोगी जंगम शेख सेवड़ा, लालच मांय रिया भटकी ॥ (संत कबीर)

तेंव्हा साहजिकच आहे, समाजाच्या सर्वच घटकांचा अत्यंत निष्ठेने आणि अस्थेने अवलोकन करणाऱ्या संत तूकोबांनी सुद्धा अल्लाहचा संदर्भ घेऊन किंवा ईश्वराप्रमाणेच अल्लाहला संबोधून अभंग लिहिले आहेत.

तुकोबांनी आपल्या समकालीन तसेच भूतकाळातील संतांच्या अभंगांचे अवलोकन नक्कीच केले असले पाहिजे आणि त्याच न्यायाने आपल्या पूर्वकालीन संतांच्या पावलावर पाऊल टाकून ते अभंग निर्मिती करत राहिले. याशिवाय अत्यंत महत्वाचे म्हणजे तुकोबांचे समकालीन संत हजरत सय्यद अनघड शहा बाबा हे मुस्लीम संत तुकोबांचे जिवलग मित्र आणि नंतर त्यांनी तुकोबांचे शिष्यत्व पत्करले ! याचा दाखला म्हणजे आजसुद्धा श्री क्षेत्र देहू येथून तुकोबांच्या पालखीचे प्रस्थान झाल्यानतर तुकोबांच्या पालखीचा एक मुक्काम देहू गावाबाहेर असलेल्या संत हजरत सय्यद अनघड शहा बाबा यांच्या दर्ग्याच्या ठिकाणी असतो आणि तिथेच पहिली आरती होते ! यावेळी तुकोबांच्या वंशाजांसह तमाम पंढरीचे वारकरी संत अनघड शहा बाबांच्या समाधीचे (दर्ग्याचे) दर्शन घेऊन पंढरपूरला मार्गस्थ होतात. केवढी सामाजिक समरसता आणि धार्मिक सहिष्णुता वारकरी अंगिकारतात ! मला वाटते यापेक्षा मोठे हिंदू-मुस्लीम एकोप्याचे दर्शन जगांत कुठे सापडणे अश्यक्यच !

त्याच अनुषंगाने संत तुकोबाराय आपल्या "वैद्यगोळी" प्रकरणातील या अभंगात अल्लाह म्हणजेच ईश्वराचा उल्लेख करून तमाम हिंदू-मुसलमान बंधू-भगिनींना उपदेश करतांना हा अभंग लिहितात.

अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारु अल्ला खिलावे ।
अल्ला बगर नही कोये अल्ला करे सो हि होये ॥1॥
मर्द होये वो खडा फीर नामर्दकुं नहीं धीर ।
आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या खुमासी ॥धृ॥
सब रसोंका किया मार । भजनगोली एक हि सार ।
इमान तो सब ही सखा । थोडी तो भी लेकर ज्या ॥2॥
जिन्हो पास नीत सोये । वो हि बसकर तिरोवे ।
सांतो पांचो मार चलावे । उतार सो पीछे खावे ॥3॥
सब ज्वानी निकल जावे । पीछे गधडा मटी खावे ।
गांवढाळ सो क्या लेवे । हगवनि भरी नहि धोवे ॥4॥
मेरी दारु जिन्हें खाया । दिदार दरगां सो हि पाया ।
तल्हे मुंढी घाल जावे । बिगारी सोवे क्या लेवे ॥5॥
बजारका बुझे भाव । वो हि पुसता आवे ठाव ।
फुकट बाटु कहे तुका । लेवे सोहि लें हिसखा ॥6॥

अभंग अत्यंत सहज-सोपा असून नेहमीप्रमाणेच वाचक-श्रोत्यांची झणझणीत कानउघाडणी करणारा आहे. संत तुकाराम हे केवळ लोकशिक्षक नसून ते लोकवैद्य म्हणून सुद्धा सिद्ध होतांना दिसतात. या अभंगात संत तुकोबाराय 'खरा मर्द म्हणजे शूर कोण (?)' याचा संदर्भ देतांना दिसतात. मर्द म्हणजे ज्याच्याकडे संयम आहे तोच खरा मर्द ! उथळ पाण्याला खळखळाट आणणारा खरा मर्द असूच शकत नाही. माणसाने आपल्या



मनाला आनंदी करण्यासाठी सत्ता, संपत्ती आणि तारुण्य या तीन गोष्टींचा गर्व न करता रज, तम आणि सत्व या गुणांवर विजय मिळवून जीवनाचा आनंदोत्सव साजरा करावा ! संसारिक सर्वच रसांवर तुकोबांचे "भजनगोळी" हे रामबाण औषध असून इमानदारीच माणसाच्या सोबत येते, तेंव्हा तारुण्य हातातून निसटून जाण्याअगोदर सर्वांनी सावध व्हावे. आपले जीवन केवळ खाण्या-पिण्यात वाया घालवण्यापेक्षा काहीतरी सत्कर्म करत रहावे ज्यामुळे सप्त धातू आणि पंच महाभूतांनी बनलेल्या शरीराचे काहीतरी सार्थक होईल. आपल्या जीवनातील उतारालाच आपण सर्वांनी समाज-देश-कुटुंब ऋण फेडण्याचा प्रयत्न करावा, कारण पुढे वृद्धत्वाचा चढ लागला कि; दैनंदिन जीवन जगणे कठीण जाते. तेंव्हा तुकोबा आपल्यासारखे जे लोक केवळ संसाराचा भार वाहून जगतात ते संसाराचे गाढवं असून त्यांनी तुकोबांची भजन रुपी दवा-दारू घेऊन जीवन कृतार्थ करावे. याच अभंगाच्या शेवटी तुकोबा म्हणतात, मी हे धन फुकट वाटतो आहे, ज्यांना घायचे आहे त्यांनी घावे आणि मानवी जीवनाचे कल्याण करावे. अगदी त्यांच्याच

सेवितो हा रस वाटितो आणिकां | घ्या रे होऊ नका रानभरी ॥
तुका म्हणे मज धाडीले निरोपा | मारग हा सोपा सुखरुप ॥

या अभंगाप्रमाणे त्यांची फुकटची वैद्यगोळी घेऊन जीवन भजनानंदी बनवावे. भजन म्हणजेच गायन-वादन आणि त्याच्यातून निर्माण झालेला स्वर-माधुर्य कुणालाही मंत्रमुग्ध केल्याशिवाय रहात नाही ! भजन म्हणतांना किंवा ऐकतांना माणसाची कधी ब्रह्मानंदी टाळी लागते (?) ते कळत सुद्धा नाही ! माणूस क्षणार्धात सर्व सर्सारीक सुख-दुःखं विसरून तल्लीन होऊन जातो ! हीच तुकोबांची वैद्यगोळी आपण घेणे आवश्यक आहे.

आज आपण एकविसाव्या शतकांत जीवन व्यतीत करतांना सर्वच महान संत-विचारवंत यांचे लेखन आणि जीवन आपल्यासाठी आदर्श आहे. त्यांनी दिलेल्या योगदानाचे आपण सर्वांनी मोठ्या सावधानतेने अवलोकन करून आपला वर्तमान आणि भोवताल आनंदी-सुशोभित करणे काळाची गरज बनले आहे. आज तुकाराम नीती या सदरांतर्गत निवडलेल्या अभंगाची सुरुवातच "अल्लाह" या मुस्लीम दैवतापासून असून आपण त्यामधून बराच बोध घेण्याची वेळ आली आहे. जगातील कोणताही धर्म असो तो माणसांसाठी आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. कोणत्याही बाबतीत कट्टरता माणसांना सर्वकाळ मारकच ठरतांना आपण पहिले आहे. आपला भारत देश धर्म सहिष्णू म्हणून जगभर ओळखला जातो, तेंव्हा आपण सर्वानीच एकमेकांच्या दैवतं आणि प्रतीकं याचा सन्मान राखला पाहिजे. या वर्षी आपला देश भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असून आपण सर्वांनी सहृदयतेने देशाचा, देशातील प्रत्येक नागरिकाचा आणि सर्वच धर्मांचा सन्मान राखणे क्रमप्राप्त आहे. तुकाराम महाराजांनी पूजा म्हणजे काय ? याचे उत्तर फार सोपे दिले आहे,

कोण्याही जीवाचा न घडो मत्सर | वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥

एवढी सोपी व्याख्या सांगितली आहे. तेंव्हा कोणत्याही व्यक्ती किंवा धर्माचा द्वेष-मत्सर करून आपल्याला आपला धर्म मोठा करता येत नाही, याचे सार्वांनीच भान ठेवावे आणि आपल्या देशाची अखंडता, एकात्मता राखून आणि भारतीय राज्यघटनेचे पावित्र्य राखावे !

मज़हब नहीं सिखाता आपस में बैर रखना
हिन्दी हैं हम वतन है हिन्दोस्ताँ हमारा

या देशभक्तीपर गीताप्रमाणे संपूर्ण भारतात सर्वच धर्माच्या मिरवणुका कोणत्याही अडथळ्याविना संपन्न होतील. असे होणे म्हणजेच तुकोबांच्या सर्वधर्म समभाव या शिकवणुकीचे सार्थक होईल आणि धर्म सहिष्णू देश म्हणून भारताचा तिरंगा जगभर मोठ्या सन्मानाने फडकत राहील यात तिळमात्र शंका नाही ! जय तुकोबाराय !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# “इक ऐसे गगन के तले...”

आधुनिक केसरी

**काहींना किशोर’दा मधला गायक जास्त आवडतो, पण मला मात्र तो अभिनेता म्हणून जास्त भावला. त्यांच्या अंतरातलं अल्हड, अवखळ बालपण त्यांच्या भुमिकांमध्ये नॅचरली उतरायचं. किशोर’दा जितके विक्षिप्त होते तितकेच हळवे देखील होते. सगळ्यांना खदखदून हसवणाऱ्या या फनकाराच्या मनात एक संवेदनशील माणूस दडलेला होता, याची साक्ष म्हणजे; १९६४ साली त्यांनीच निर्मिलेला आणि दिग्दर्शित केलेला ‘दूर गगन की छाँव में’ हा चित्रपट!**

आमच्या फैजपूर गावच्या श्रीराम थिएटरमध्ये १९७१ला किशोर’दांचा मी पाहिलेला पहिला चित्रपट हा ‘पडोसन’ होता. त्यावेळी माझं वय जेमतेम दहा वर्ष असेल! साध्या खुर्चीच्या एका तिकिटासाठी तेव्हा पंचावन्न पैसे लागायचे. सिनेमा बघायला आम्ही चार-पांच लंगोटी यार सोबतच जात असू. सगळेच मित्र सामान्य घरातले, कुणाच्या खिशात आठ आणे निघायचे तर कुणाजवळ वीस तीस पैसे. मी व्यापाऱ्याचा मुलगा असल्यानं; माझ्या खिशात हमखास दीड-दोन रुपये मिळायचे. कशीतरी सगळ्यांची जुळवाजुळव करुन जावून बसायचो आम्ही थियेटरात. एवढ्याशा त्या पैशातही तेव्हा खूप मौज मजा करायला मिळायची. त्या वयातलं मैत्रीचं जग रुपेरी होतं आणि काळही सोनेरी होता. नुसती सायकल हातात असली तरी बादशहा व्हायचो आम्ही.

सिनेमा थियेटरच्या त्या गोष्टींना आज जवळजवळ पन्नास वर्षे झाली. काळ खूपच पुढे सरकला पण काही गोष्टी मनात तशाच ठेवून गेला. अगदी आपले उछल-कुद किशोर’दा सुद्धा!

भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय महान गायकांपैकी एक असलेला हा फनकार, निव्वळ गायक वा अभिनेताच नाही तर संगीतकार, गीतकार, दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथा लेखकही होता. आभास कुमार गांगुली हे जन्म नाव असलेल्या या अवलियाचा जन्म, मध्यप्रदेशातील खंडवा येथे ०४ ऑगस्ट १९२९ला एका बंगाली ब्राम्हण कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली (गंगोपाध्याय) हे वकील होते. आणि आई गौरी देवी ही एका श्रीमंत कुटुंबातून आलेली होती. अशोक कुमार, सती देवी, अनुप कुमार आणि किशोर’दा अशी ही चार भावंडं! भावंडांमध्ये किशोर’दा सगळ्यात लहान. मोठा भाऊ अशोक कुमार हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते म्हणून स्थिरावल्यावर या गांगुली कुटुंबाचं नेहमीच मुंबईला जाणं-येणं होतं. इंदूरच्या ख्रिश्चन कॉलेजमधून पदवी संपादन केलेल्या किशोर’दानी आपला पहिला आवाज १९४६ला आलेल्या ‘शिकारी’ चित्रपटातील, ‘ओ रंगीला रंगीला...’ या समुह गीतासाठी दिला होता. या चित्रपटामध्ये त्यांनी छोटीसी भुमिकाही केली होती. किशोर’दा तेव्हा सतरा वर्षांचे होते. आपलं पहिलं एकल (सोलो) गीत, ‘मरने की दुआयें क्यू माँगू...’ हे त्यांनी देव आनंदसाठी गायलं होतं. चित्रपट होता १९४८चा जिद्दी! लतासोबतचं त्यांचं पहिलं युगल गीतही याच चित्रपटातलं!

या नंतर किशोर’दाना अनेक ऑफर्स येत होत्या, पण चित्रपटातील आपल्या कारकिर्दीबद्दल ते फारसे गंभीर नव्हते. अशोक कुमार यांना वाटायचं की - किशोरने आपल्यासारखं अभिनेता व्हावं, किशोर’दांना मात्र गायकीत रस होता. बॉम्बे टॉकीजच्या १९५१साली आलेल्या फणी मुजुमदार दिग्दर्शित, ‘आंदोलन’ या चित्रपटात त्यांनी मुख्य नायकाची आपली पहिली भुमिका साकारली. सुरवातीच्या त्या काळात किशोर’दांनाही खूप स्ट्रगल करावं लागलेलं. मात्र, ‘लड़की’, ‘नौकरी’ आणि ‘बाप रे बाप’ने यशाची पायरी दाखविल्यानंतर अभिनेता म्हणून त्यांचं मन रमू लागलं. कवी आणि चित्रकार रवींद्रनाथ टागोर यांच्याबद्दल आदर असलेल्या या कलाकारावर, महान गायक सैगल यांचा खूप प्रभाव होता. हॉलिवूड अभिनेता डॅनी कायचे ते खूप मोठे प्रशंसक होते. या तीनही व्यक्तींची छायाचित्रे त्यांनी आपल्या ‘गौरी कुंज’ या निवासस्थानी टांगून ठेवली होती. दररोज ते आदराने त्यांना नमनही करायचे.

बिमल रॉय दिग्दर्शित ‘नौकरी’ चित्रपटाच्या वेळेस संगीतकार सलील चौधरी यांना जेव्हा कळालं की, किशोर’दांनी संगीत कलेचं कुठलंही औपचारिक प्रशिक्षण घेतलं नाहीये, तेव्हा त्यांनी गायक म्हणून त्यांना सपशेल नकार दिला. मात्र किशोर’दांचा आवाज ऐकल्यावर ‘छोटासा घर होगा...’ हे गाणं त्यांच्याकडून गावून घेतलं. अभिनेता म्हणून १९५४ ते १९६६चा काळ किशोर’दांनी गाजवला. व्यावसायिक दृष्ट्या त्यांचे यशस्वी चित्रपट सांगायचे झाले तर ‘बाप रे बाप’, ‘नई देहली’, ‘जालसाज’, ‘भाई भाई’, ‘झुमरू’, ‘मनमौजी’, ‘हाफ टिकट’, ‘मि. एक्स इन बॉम्बे’, ‘श्रीमान फंटूश’, ‘गंगा की लहरें’, ‘चलती का नाम गाड़ी’, ‘श्रीमानजी’, ‘पड़ोसन’, ‘दूर का राही’ हिट सिनेमांची ही मांदियाळी तशी न संपणारीच! तिघा भावांची भुमिका असलेल्या त्यांच्या ‘चलती का नाम गाड़ी’ने तर धमाल उडवून दिली होती. ‘हाफ टिकट’ चित्रपटातील ‘आके सिधी लगे तेरी...’ या युगल गीताला किशोर’दांनी मेल-फिमेल असे दोन्ही आवाज दिले होते.

किशोर’दांचे चित्रपट आहेच इतके भन्नाट की, माणसाच्या आयुष्याचा मूड बदलण्याचं सामर्थ्य त्यांच्या त्या हरफनमौला शैलीत आहे. त्यांचा ‘हॉफ टिकट’ तर सर्व कॉमेडियन चित्रपटांचा कळस म्हणायला हवा. ‘पडोसन’ मधला त्यांनी साकारलेला विद्यापती आणि मन्ना डे सोबतची त्यांची ती ‘एक चतुर नार...’ ची जुगलबंदी निव्वळ अविस्मरणीय! ‘पडोसन’ मी आजपर्यंत सात आठ वेळेस तरी बघितला असेल. अभिजात असे त्यातले ते एकेक कॅरेक्टर्स, भोला, विद्यापती, बनारसी, कोलकत्तय्या आणि लाहोरी असे सगळेच कसे खासम खास आहेत. ‘कहना है कहना है...’, ‘मेरे सामने वाली...’ ही गाणी नुसती ऐकली बघितली तरी माणसाचा मूड एकदम फ्रेश होवून जातो. धोती-कुर्ता, गळ्यात मफलर आणि पान खाऊन ओठ रंगलेला किशोर’दांचा त्यामधला लूक जबरदस्तचंय. हातवारे करतानाचे त्यांचे ते झुपकेदार केस, नजरेतला तो लाजवाब अभिनय आणि किशोर’दांचं शब्दाशब्दांसोबत ते झुलणं... बस्स, नुस्तं बघत राहावं!

किशोर’दांच्या गायकीची शैली विकसित करण्याचं श्रेय मात्र सचिन देव बर्मन यांनाच द्यायला हवं. १९५०च्या ‘मशाल’ चित्रपटासाठी सचिन’दा एकदा अशोक कुमार यांच्या घरी गेलेले. तिथे त्यांनी किशोर’दांना सैगलच्या आवाजाचं अनुकरण करताना ऐकलं, त्यावेळी किशोर’दांचं कौतुक त्यांनी केलंच पण, ‘सैगलची कॉपी करण्याऐवजी तू स्वतःची एक शैली का निर्माण करत नाही? असा सल्लाही दिला. अखेरीस; किशोर’दांनी गाण्यात, योडलिंग ही स्वतःची शैली तर निर्माण केलीच शिवाय, त्याचा अत्यंत खुबीनं वापर करणारे ते एकमेव फनकारही ठरले. १९५० ते १९७०च्या सुरवातीपर्यंत बर्मन’दांनी देव आनंदसाठी किशोर’दाकडून एकाहून एक सरस अशी गाणी गावून घेतली. ‘ये दिल ना होता बेचारा...’, ‘आसमां के निचे...’ ज्वेल थीफ़ / ‘माना जनाब ने...’, छोड़ दो आँचल...’, ‘ओ निगाहें मस्ताना...’, पेइंग गेस्ट / ‘हम है राही प्यार के...’ नौ दो ग्यारह / ‘अरे यार मेरी...’, ‘खाव्ब हो तुम...’ तीन देवियाँ / ‘शोख़ियों में घोला जाये...’, ‘फुलों की रंग से...’ प्रेम पुजारी / ‘ऐ, मैंने कसम ली...’, ‘जीवन की बगियाँ...’ तेरे मेरे सपने.

साठ आणि सत्तरचं दशक किशोर’दांच्याच गाण्यांचं होतं. गायक म्हणून सचिन देव बर्मन सहित त्यांनी त्या वेळेच्या सलील’दा, खय्याम, राजेश रोशन, नौशाद, सी रामचंद्र, शंकर-जयकिशन, रवी, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, आर. डी. बर्मन, कल्याणजी-आनंदजी, बप्पी लाहिरी या सारख्या सगळ्याच नावाजलेल्या संगीतकारांबरोबर काम केलं.

शक्ती सामंत निर्मित आणि दिग्दर्शित १९६९आलेल्या ‘आराधना’ चित्रपटातील किशोर’दांच्या, ‘मेरे सपनों की रानी...’, कोरा कागज़ था...’, आणि ‘रूप तेरा मस्ताना...’ या तीनही गाण्यांनी त्यांना टॉपचा सिंगर म्हणून मान्यता मिळवून दिली. ‘रूप तेरा मस्ताना...’ या गाण्याने तर पहिला फिल्मफेअर पुरस्कारही जिंकून दिला. किशोर आणि राजेश खन्नाच्या समीकरणाला चाहत्यांनी मग डोक्यावरच घेतलं. ‘जिंदगी एक सफ़र...’ / जीवन से भरी...’ / ओ मेरे दिल के चैन...’ अशी एकाहून एक सरस गाणी किशोर’दांनी मग राजेश खन्नासाठी गायली.

किशोरदांची हिट गाणी म्हटली तर कोणती गाणी लिहावी असा प्रश्न पडतो. ‘जरुरत है जरुरत है....’ / ‘मेरे मेहबूब क़यामत होगी...’ / चिल चिल चिल्ला के...’ / लेकर हम...’ / ओ साथी रे...’ / ‘पल पल दिल के पास...’ / ‘तुम बिन जाऊँ कहाँ...’ / ‘खिलतें हैं गुल यहाँ...’ / ‘मेरी भीगी भीगी सी...’ / ‘प्यार दिवाना होता है...’ / ‘कांची रे कांची रे...’ / ‘पल भर के लिये...’ / ‘तुम आ गये हो...’ न संपणारी अशी ही चांदण बरसात आहे. तरी या गीतांमध्ये मी फारसे युगल गीत घेतलेच नाहीये. आश्चर्याची गोष्ट म्हणजे; १९५९ साली आलेल्या ‘शरारत’ या चित्रपटातील, ‘अजब हैं दास्ताँ तेरी...’ या गाण्यासाठी महान गायक रफ़ी साहेबांनी किशोर’दांसाठी पार्श्वगायन केलं होतं.

किशोर’दांची हरेक अदा म्हणजे हास्याची मेजवानीच असायची. एकदा एका पत्रकाराने किशोर’दांना टोकलेलं - ‘तुम्ही सहसा एकटेच दिसता, पार्टीत वगैरे कुठं जात नाही काय?’ तेव्हा किशोर’दा उत्तरलेले - ‘पार्टीत तर मी जातच असतो, पण ही पार्टी माझ्या अंगणात जमते. समोरची ही जी झाडं दिसताहेत ना, मी त्यांच्याशी बोलत असतो.’ किशोर’दांनी झाडांना अमृतांजन, हरी निरंजन, फटाफट अशी सगळी नावं दिलेली होती.

दिलीप कुमार ते कुणाल गोस्वामीपर्यंतच्या आघाडीच्या सर्वच अभिनेत्यांसाठी पार्श्वगायन करणाऱ्या या फनकाराने, चार लग्न केली होती. त्यांची पहिली पत्नी बंगाली गायिका रुमा गुहा (घोष) होती. दुसरी पत्नी अभिनेत्री मधुबाला, इस्लाम धर्म स्विकारुन त्यांनी मधुबालाशी विवाह केला होता. या सोहळ्याला मात्र किशोर’दांच्या घरच्यांची उपस्थिती नव्हती. मधुबाला ही किशोर’दांची पत्नी म्हणून कधीच स्विकारली गेली नाही. तिच्या मृत्युनंतर किशोर’दांनी पुढे तिसरं लग्न योगिताबालीशी केलं. आणि चवथं लीना चंदावरकरशी!

गाण्यासाठीचं मानधन मिळाल्यावरच किशोर’दा गाण्याचं रेकॉर्डिंग करायचे. ‘पैसे नाही तर काम नाही’ हा सिद्धांत ठेवूनही कधी कधी त्यांनी विनामूल्य रेकॉर्डिंगही करुन दिलं. त्यांच्या तऱ्हेवाईक वागण्याबद्दलचे काही किस्से सुद्धा प्रसिद्ध आहेत.

सर्वश्रेष्ठ गायकासाठीच्या आठ फिल्मफेअर पुरस्कारावर आपल्या नावाची मोहोर सोडलेल्या या गायक-अभिनेत्याला, फिल्मफेअरचे आणखी एकोणीस नामांकन, आणि बंगाल फिल्म असोसिएशनचे चार पुरस्कार मिळाले होते.

एकोणीसशे सत्त्याऐंशीच्या दरम्यान संगीतकारांनी तयार केलेल्या सुरांविषयी ते जरा नाखुशच होते. सत्त्याऐंशीच्या सप्टेंबरला निवृत्ती घेऊन आपल्या जन्मगावी खंडव्याला नेहमीसाठी जाणारही होते, पण ते राहिलंच! आणि १३ ऑक्टोबर १९८७ला अशोक कुमार यांच्या वाढदिवशीच दुपारी ४.४५ मिनिटांनी आलेल्या हृदयविकाराच्या तिसऱ्या झटक्यानं त्यांचं निधन झालं.

काहींना किशोर’दा मधला गायक जास्त आवडतो, पण मला मात्र तो अभिनेता म्हणून जास्त भावला. त्यांच्या अंतरातलं अल्हड, अवखळ बालपण त्यांच्या भुमिकांमध्ये नॅचरली उतरायचं. किशोर’दा जितके विक्षिप्त होते तितकेच हळवे देखील होते. सगळ्यांना खदखदून हसवणाऱ्या या फनकाराच्या मनात एक संवेदनशील माणूस दडलेला होता, याची साक्ष म्हणजे; १९६४ साली त्यांनीच निर्मिलेला आणि दिग्दर्शित केलेला ‘दूर गगन की छाँव में’ हा चित्रपट!

माहित नाही, गीत-संगीताचा हा बादशाहा, आपल्यातून लवकर का निघून गेला?... अशा एखाद्या गगनाच्या, अशा एखाद्या दुनियेच्या, शोधात तर नाही ना हा हरफनमौला निघून गेला - जिथं कुणाला दुःख छळत नाही, जिथं कुणाच्या डोळ्यांत आसवं दिसत नाही? त्यासाठीच की काय; आता जेव्हा जेव्हा किशोर’दांची आठवण येते, तेव्हा तेव्हा त्यांच्याच लेखणीतून उतरलेले, त्यांनीच संगीतबद्ध केलेले, आणि त्यांनीच गायलेले हे गीत माझ्या ओठांवर तरळून जाईल -

‘आ चल के तुझे मैं ले के चलू
इक ऐसे गगन के तले
जहाँ ग़म भी ना हो, आसूँ भी ना हो
बस प्यार ही प्यार पले
इक ऐसे गगन के तले...’

संदर्भ : विकिपिडीया, यु-ट्युब, PEOPLE & HISTORY.




## मला भावलेली सिनेरत्न



मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236

# वेबसिरीज - हिंसात्मक कहाण्या, प्रेमळ कौटुंबिक कथा - मिश्र अनुभव

आधुनिक केसरी

**सिरीज/सिनेमा हिंसात्मक असण्याचे प्रमाण वाढते आहे. कथेत नातेसंबंधांवरही थोडेफार भाष्य केलेले असते. पण कथा जर गुन्ह्यासंबंधीची असेल तर मग थरारकतेला पर्यायच नसतो. वास्तव जगात हिंसा व लैंगिक बळजबरी वाढल्यामुळे फिक्शनही तसेच तयार होतेय की सिनेमा-सिरीजमध्ये हिंसक प्रसंग असल्याने खऱ्या जगातली गुन्हेगारी वाढतेय - हे समजू नये इतपत सगळीच सरमिसळ झालेली आहे. समाज या सगळ्यांमध्ये ओढला जातोय, विधायक गोष्टींना कमी टीआरपी मिळतोय, आपण अधोगतीकडे निघालोय याचे हे लक्षण आहे का ? मेंदू विचारांनी नुसता गरगरतोय...याचे उत्तर कोण देऊ शकेल ?**







नेटफ्लिक्सवर आरण्यक सिरीज पाहिली. अनेक चेहरे नवे असूनही अभिनयात कमी वाटत नाहीत. बर्फाच्छादित परिसराच्या पार्श्वभूमीवर थंड डोक्याने होणाऱ्या अत्याचारांची दृश्ये अंगावर शहारे आणतात. कथेतल्या मुख्य व्यक्तिरेखा चांगल्या उभ्या केल्या आहेत. परमव्रत चटर्जी आवडता कलाकार आहे, रविना टंडनही प्रभाव पाडते. दुसऱ्या सीझनची वाट पाहण्याइतपत उत्कंठा ताणली गेली आहे.

आर्या ही हॉटस्टारवरची सिरीज सुश्मिता सेनच्या मुख्य भूमिकेसाठी पाहिली. पहिला भाग खूपच रक्तबंबाळ होता. त्यातील लहान मुलांच्या भविष्याबद्दल उत्सुकता निर्माण झाल्याने दुसरा भाग पाहिला. तोही हिंसामयच आहे. तिसराही लवकरच येईल व तोही तसाच असेल अशी शक्यता आहे. रुद्र (हॉटस्टार) हीदेखील केवळ हिंसक दृश्यांनी खच्चून भरलेली सिरीज आहे. अजय देवगण मुख्य भूमिकेत आणि अतुल कुलकर्णी हा उत्तम अभिनेता असूनही कथेचा फारसा प्रभाव पडत नाही.

ह्यूमन (हॉटस्टार) या मालिकेत एक डॉक्टर स्वतःच्या हॉस्पिटलमध्ये अमानुष आणि अनैतिक गोष्टींना प्रोत्साहन देऊन पेशंटवर उपचार करण्याचा बिझनेस करते व पैसे कमावते. तिच्या या वागण्याचे कारण काही दिलेले नाही, फक्त तिची हाव वाढत जाते आणि दवाखान्यातील अनेक अन्याय्य बाबी हळूहळू उघड होऊ लागतात. तिचे वागणे निराधार असल्याने ते पटत नाही.

एमेक्स प्लेयरवर आश्रम या सीरिजचे तीन सीझन्स आहेत. बुवाबाजीच्या नावाखाली ढोंगी आणि गुन्हेगार माणसांनी सामान्य माणसांना नादी लावून कसे गंडवले आणि बायकामुलींची अब्रू लुटली याचे चित्रण त्यात केलेले आहे आणि ज्यांनी विरोध केला त्यांना मारून टाकले. ते सर्व बघताना आपण अक्षरशः हादरून जातो.

प्लनेट मराठी या ओटीटीवर रानबाजार ही सिरीज अलीकडेच आली आहे. त्यात राज्याचे मंत्री, पत्रकार ते पोलीस, गुंड, सामान्य जनता, वेश्या या सर्व थरांवरील स्वार्थी वर्तणूक, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, लंपटपणा यांचे वास्तव दर्शन घडवले आहे. शिवराळ भाषेचा अतिरेक आहे. राजकारण किती खालच्या पातळीला गेले आहे, हे समजून आपण विषण्ण होतो.

एकुणात सिरीज/सिनेमा हिंसात्मक असण्याचे प्रमाण वाढते आहे. कथेत नातेसंबंधांवरही थोडेफार भाष्य केलेले असते. पण कथा जर गुन्ह्यासंबंधीची असेल तर मग थरारकतेला पर्यायच नसतो. वास्तव जगात हिंसा व लैंगिक बळजबरी वाढल्यामुळे फिक्शनही तसेच तयार होतेय की सिनेमा-सिरीजमध्ये हिंसक प्रसंग असल्याने खऱ्या जगातली गुन्हेगारी वाढतेय - हे समजू नये इतपत सगळीच सरमिसळ झालेली आहे. समाज या सगळ्यांमध्ये ओढला जातोय, विधायक गोष्टींना कमी टीआरपी मिळतोय, आपण अधोगतीकडे निघालोय याचे हे लक्षण आहे का ? मेंदू विचारांनी नुसता गरगरतोय...याचे उत्तर कोण देऊ शकेल ?

अजीब दास्तान्स (नेटफ्लिक्स) मध्ये चार वेगवेगळ्या कथा आहेत. त्या प्रेक्षकांना मिश्र अनुभव देतात. तिसरी कथा सर्वांत जास्त आवडली. ती उच्चवर्णीय स्त्री आणि दलित स्त्री यांच्या मैत्रीची गोष्ट आहे. दुसरी कथा भयानक हिंसेची आहे. पहिली व चौथी कथा स्त्रीपुरुषांच्या नात्यांचे निराळेच पैलू समोर ठेवणारी आहे.

NETFLIX वर आणखी दोन SERIES पाहिल्या. जिंदगी इन शॉर्ट आणि LITTLE THINGS. पहिली वेगवेगळ्या कथांची आहे. कथा चांगल्या आहेत. त्यांच्यात एक असे सूत्र नाही. पण पाहायला आवडतील. दुसरी मला जास्त आवडली. 27-28 वयाच्या उच्चशिक्षित मित्रमैत्रिणींचे सहजीवन हे डेअरिंग, शेअरिंग, केअरिंग कसकसे होत जाते, ते छान दाखवले आहे. रोजच घडणाऱ्या , नेहमीच्या जगण्यातल्या घटना असल्या तरी INTERSTATE/INTERLANGUAGE RELATIONSHIP , UNDERSTANDING , MATURITY , INTIMACY , EGO , MIDDLE CLASS BACKGROUND , CHILDHOOD MEMORIES , ROUTINE , HOUSEHOLD WORK, COOKING , MISCOMMUNICATION , WORK INVOLVEMENT , CAREER , COLLEAGUES, MAKING OF MONEY, LONG DISTANCE, ATTACHMENT WITH PARENTS अशा अनेक बाबींवर अगदी भावतील असे प्रसंग इतक्या सहजपणे घडल्यासारखे आहेत. मुख्य पात्रे दोनच असली तरी दोघांचे सहकारी, मित्रमैत्रिणी, आईवडील, मदतनीस वगैरे लक्षात राहणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. उच्चभ्रू मुंबई, मूळ मध्यमवर्गीय घरांची संस्कृती, अत्याधुनिक जगात वावरण्याची आकांक्षा अशा अनेक गोष्टी आल्या आहेत. मिथिला पालकर, ध्रुव सहगल यांनी लिव इन जोडपे हुबेहूब उतरवले आहे. तीन सीझन्स पाहून झाले, आता चौथ्या सीझनची वाट पाहत आहे.

# पानोपानी गहिवर; दु:ख वेल्हाळ देखणा परिघात "तिच्या"साठी, फुटे वेदनेला पान्हा...

आधुनिक केसरी

किरणांचे क्षितिजाशी काही हितगुज झाले
वृंदावनाच्या पायाशी उन्ह उतरणी आले. . .

सभोवताली गारठा भरून असल्याने असाच अंगणात उन्हाच्या तिरपी कडवश्याआड प्रा. मिनल येवले यांचा 'फुटे वेदनेला पान्हा' वाचत बसलेलो. मात्र, उपरोक्त ओळींनी क्षणभर स्थिरावलो. उन्ह उतरणीला आले. . . किती छान संकल्पना. . यापूर्वी प्रा. मिनल येवलेचा 'परिघ' वाचलेला. कवयित्री म्हणून प्रा. मिनल येवले अवघ्या महाराष्ट्राला सुपरिचित. त्यांच्या ललितबधांनी वाचकमनावर कायम गारूड केलेलं. त्यांच्या मोहमयी शब्दांच्या अक्षर मात्रांनी माझ्या काळजाचा आसमंत व्यापून टाकलेल्या कवी, कवियत्रीच्या मांदियाळीतले अत्यंत आपुलकीने घ्यावे असे नाव म्हणजे प्रा. मिनल येवले.

आजपावतो प्रत्यक्ष भेटीचा योग आला नसला तरी प्रा. येवले नेहमीच त्यांच्या कविता, ललितबंधाच्या माध्यमातून भेटत राहिलेल्या. स्नेहसखी, प्राणसखी असलेली कविता प्रा. मिनल येवलेंना वयाच्या अवखळ वळणावर नांदत्या पावलांसवे भेटली. स्नेहाचे ऋणानुबंध साधतांना ती तीची जिवाभावाची मैत्रीन कधी झाली कळलेच नाही.


' स्त्रि'त्वाची आर्तता पूर्वापार अगदी संतकवीयत्री जनाबाईपासून आजगायत अगदी प्रा. मिनल येवलेपर्यंत तितक्याच प्रामाणिकपणे अधोरेखीत होते आहे. या कवियत्रीला संतकाव्याचा आर्त ओला स्पर्श झाला आहे. 'स्त्री'त्वाप्रती ममत्वाचा गहीवर, मायेची आर्तता प्रा. येवले यांच्या सर्वच काव्यसंग्रहांमधून आणि विविधांगी ललित बंधामधून लिलया अभिव्यक्त होते. त्यांचा ललित संग्रह 'आंदण' या दृष्टिने निश्चितच अभ्यासण्याजोगा आहे. कवितेची प्रामाणिक नाळ जापतांना कवयित्री म्हणते...

तू भेटली नसती तर...
मागच्या पानावरून पुढे काळ रेटत राहिला असता
निरर्थकाच्या पोकळीत कुणी श्वास भरला नसता हसता रडता ओठांवरती
स्फुरले नसते गाणे ..
तुला कसे कळले असते माझे व्याकूळ होणे!

सभोवताली अनेक कवी, कवियत्री मुक्तछंदाच्या गळाला लटकून काव्य प्रांतात गटांगळ्या खातांना दिसतात.मात्र, या कोलाहलात प्रा. मिनल येवले यांची अष्टाक्षरी कविता लयबद्धतेची रुणझुणती पैंजणे शब्दाच्या पावली बांधून अक्षरांना गेयतेचे अक्षरलेणे बहाल करते. कविता अलबतच बोलकी होते. ती म्हणते...

मौनातल्या पाखरांनी
गळ घातली गाण्याची
पुनवेच्या चांदण्याला
सय जुन्या उखाण्याची...

विविधांगी नात्याचे स्नेहल रिमझिमीतले निश्चल कोरडेपण तितक्याच प्रभावीपणे प्रा. येवले मांडतात. ते असे...




जगण्याचे पारदर्शी पदर सोलूनही
कुठे गवसली अजून
गाभ्याकडे जाण्याची वाट?
काळजात भरून घागर स्मेहप्रेमाची
तरी कोरडेत राहिलेत काठ....

प्रा. मिनल येवले यांच्या कवितेत कारूण्य रसाची आर्तता, भावस्पर्शी संवेदना आणि प्रतिमा-प्रतिकांची लयबद्ध गुंफण वाचकाला स्तंभीत करते. ती एका सफल संपुर्ण भावूक वळणावर प्रसिद्ध गझलकार संगीता जोशींच्या आशयघन ओळींची पुन्हा पुन्हा प्रचिती देते. प्रश्न उपस्थित करते. तो असा की, ....

एकदाच मला सांगशील का?
का माझ्या ह्रदयात ओतलीस
भावूक कविता?
एक निरंतर संवेदना
मला सामावून घेते आहे.

**-सत्य प्रयागबाई कुटे,** शब्दमळा बुक गॅलरी, चिखली, जिल्हा बुलडाणा, मो. ९८८१३१०२५८






## माय दुधातला सार



व्याप संसाराचा मोठा,
माय जाते दूर दूर ।
होता आठवण तिची,
येई पापणीला पूर ।।

तिला हट्टाने मागावा,
चोळी बांगडी आहेर ।
माय घरात तोवरी,
खरं लेकीचं माहेर ।।

मायी वाचून लेकीची,
नाही कुणाला कदर ।
थोडी कोमेजून जाता,
द्रष्ट काढतो पदर ।।

किती राखूद्या सासरी,
तिने तब्बेतीचा आब ।
माय भेटताच बोले,
झालं लेकरु खराब ।।

गाठ पडता चुकून,
घेते अलाई बलाई ।
मिठी मारुन बोलते,
माझी सुकली ग जाई ।।

माय आनंदाचं गाव,
माय काळजाचा ठावं ।
तिचं मोठेपण बाई,
साऱ्या जगाला सांगावं ।।

माय तिजोरीचा ठेवा,
माय डब्यातला मेवा ।
भूक लागता जोराची,
कधी उघडून खावा ।।

माय दुधातला सार,
माय मनाचा मोहर ।
भुकेलेल्या लेकीसाठी,
माय प्रेमाची भाकर ।।

क्षण असा येई तेंव्हा,
माया आईची कळते ।
लेक मोठेपणी जेंव्हा,
लेकराची माय होते ।।

-श्री.अशोक मिरगे,
अंबाजोगाई, जि.बीड,
मो.9421278312.

## माझी आई सावित्री

कौलाच्या झोपडीतं ।
हरवलं तीच बालपण ।।
कष्टांच्या कामांमध्ये ।
तिनं सोडल शिक्षण ।।

नातं जोडलं विठ्ठलाशी ।
माळ जपली संसाराची ।।
अडाणीपण दूर सारुनी ।
अन दिली दिक्षा शिक्षनाची ।।

शिदोरी दिली जीवनाची ।
सदा ज्ञानामृत पाजले ।।
आयुष्याच्या वाटेवरती ।
सार्थ जगणे केले ।।

प्रगल्भ झाली स्वयंपूर्ण ती ।
माझी माय सावित्री जशी ।।
पीतां माझे गुरु मजसाठी ।।
साऊ ज्योतींची जोडी कशी ।।

परिपूर्ण ती स्वबळावरी ।
सिद्ध आम्हासही बनविले ।।
मातृत्वाचा आदर्श नवा ।
वारसा आम्हा देऊन घडविले ।।

राबली, झिजली आम्हासाठी ।
संस्कार मनांतरी पेरले ।।
काळोख सरुनी अज्ञानाचा ।
माई लाखो सूर्य उजळले ।।

-वाणी ताकवणे, पुणे (खराडी )

## पंढरीची वारी



येता पंढरीची वारी
होऊयात वारकरी
जाऊ देवाच्या नगरी
शोभु विठ्ठल पुजारी

वृंदावन डोईवरी
ध्वज घेऊनिया करी
नाच करतो वैष्णव
नाद छेडी विणेकरी

ज्ञाना तुका गाऊ मुखी
भेटे वारीत श्रीहरी
देहू आळंदी वाखरी
स्वर्ग येई भूमीवरी

टाळ मृदुंग गजरी
भजनात वारकरी
भक्ती देतसे तुतारी
अश्व प्रदक्षिणा करी

देव भक्तात दंगेल
जाता देवाच्या अंगणी
रूप भक्तीचे पाहून
नाचे विठ्ठल रिंगणी

विठूमाऊलीची ओढ
सर्व जीवांना लागली
नामदेवाच्या पायरी
फुले भक्तीने वाहिली

-सौ शर्मिला प्रमोद पाटोळे,
जि ठाणे, मो. 9226993957

## सप्तरंगी श्रावण...!

सप्तरंगीत श्रावणामध्ये
घननिळा जोमाने बरसे,
चोहीकडे हिरवा-हिरवा
निसर्ग पाहून मन हर्षे.

रिमझिम पाऊस नाचतो
डोंगर-दरी अन् कपारी,
ढगाची सावली पडल्याने
सांज झाल्याचे भासे दुपारी.

श्रावणात झाडे-लता वेली
धरती आभाळाला लाजते,
पाने फुले अन् कळ्या फळे
श्रावणी पावसात सजते.

इंद्रधनुष्याची कमान ही
पूर्व दिशेला झुला झुलते,
मनमोहक श्रावणामध्ये
सृष्टी हिरवाईने खुलते.

श्रावण हा रंग उधळून
होई सण-उत्सवांचा धनी,
हिरवा निसर्ग पाहतांना
हर्ष-आनंद वाटते मनी...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## स्वप्न पाहू भविष्याचे

काम करू,घाम गाळू
स्वप्न पाहू भविष्याचे
करू इच्छा पुर्ण आता
मनांतील अपेक्षांचे...

गरिबीच्या दिवसात
मन मारून जगलो
ओझं भावनांचे फक्त
मनी जागवू लागलो...

येई फुलून संसार
आशा मनी धरूया
हात हातात घालूनी
आता संसार करूया...

कोंदलेल्या भावनांना
मुक्त श्वास घेऊ देत
मनातल्या त्या कप्प्यात
जागा थोडी राहू देत...

-सीमा मंगरूळे तवटे,
वडूज सातारा



## ... गड्या ...

थोड धिरान थोड अदबीन घे रं गड्या...
हे जीवन आहे सोंग नाही रं गड्या...!

असतील ढगभर अडचणी
तुला काय काळजी रं गड्या...

तुझ्या सोबतीला तुझ्याच कष्टाचं मागणं
तुला काय चिंता रं गड्या ?

वाईज कारणानं का थांबला रं गड्या...
क्षणभंगुर तो पक्षी उडून जाईल रं गड्या..!

पोटासाठी इपरीत वागू नको रं गड्या...
त्या खळगीला मोप मिळलं...
तू ईमान घे रं गड्या...!

का तू लोकाकड पाहतो ?
जे तुझे न्हाई र गड्या..!

तू तुझ्या मनाचा राजा...
जरा तू हक्कान घे र गड्या..!

-गजानन जोशी.

## श्रावण

आला श्रावण बहरून,
लागे सणांची आरास.
मन करीतो प्रसन्न,
असा महिना हा खास.

नव चैतन्य बहर,
गाई कोकिळ ही गाणी.
कधी अलगद वाजे,
मंद वाऱ्याची पिपाणी.

मन वेड हे बावर,
घेई झोक्यावर हिंदोळे.
पाहुनिया तृप्त होई,
आनंदाचे हे सोहळे.

कधी होई मेघनाद,
कधी बरसती सरी.
हिरवा शालू पांघरून,
धरती झाली ही नवरी.

असा श्रावण सुखाचा,
करी आनंदित सारे.
नव पालवी सोबत,
फेर धरीती हो वारे.

-ऋषिकेश बालासाहेब सुरवसे
छ. संभाजीनगर, सोनपेठ.
मो. ८४११९४७९९६ .

## पंचमीच्या सरी...

रिमझिम अंगावरी
श्रावणाच्या सरी
झोक्यामध्ये साजनाच्या
आठवणी उरी

सखी तुझ्या वेणीतल्या
केवड्याचा गंध
साजनाच्या ओठावरी
बासरीचा छंद

पारिजात अंगणात
केशराचा सडा
ओठ लाल साजनाचे
रंगुनिया विडा

झोक्यावरी बटा उडे
अंगी चढे धुंदी
साजनाचे प्रेम दिसे
रंगली मेहंदी

ओठ करी गोड सखे
भुलईची गाणी
साजन तो कृष्ण सखा
साठवला मनी

-बलराज संघई
मो. 9420015108

## रंगतरंग...

बसले होते मळ्यात
नजर गेली तळ्यात
फुलांचा हार शोभे
देवाच्या गळ्यात

पैठणीचा मोर माझ्या
जरतारी शालूवरती
रंगाने हा खुलून दिसे
जसा पदरावरती

पाऊस, गारा पडती
कसे मोर नाचती
रोज असे का घडत नाही
मनी खंत वाटती

इंद्रधनुचे रंग कसे
एकमेका बोलती
रंगतरंग खुले कसे
इथे भरजरीवरती

झाडामधुनी सुंदर ती
किरणे दिसती
बघत रहावे त्याकडे
पण डोळे मात्र दिपती

मावळताना सुर्य दिसे
जणु चेंडु डोंगरावरती
नभातल्या या चंद्राला
सारे मामा बोलावती

ये ना चंदामामा तू
का रे ढगाआड लपती
आई गाते अंगाई
अन् बाळ झोपी जाती

सौ. भाग्यश्री दायमा.

## शिरवे

थेंब थेंबाचे शिरवे
हळू हळूच झरले
श्रावणाच्या महिन्यात
बाई भिजले इरले

पडे उन्हात पाऊस
दृश्य मोहक सुंदर
फिटे डोळ्याचे पारणे
रूप सृष्टी मनोहर

खेळे क्षितीज पंचमी
सप्तरंगी पिचकारी
सात रंगी इंद्रधनू
उमटले अलवारी

सोन सोनेरी उन्हात
पावसाची फवारणी
लपा छपीच्या खेळाचा
मास आहेच श्रावणी

सणवार उपवास
श्रावणात रेलचेल
आभाळाला भिडतोया
उंच झोक्याचा गं वेल

तृणपाती मखमल
रंग तो हिरवागार
श्रावणात पावसाची
फवारते बाई धार

-सौ संगीता माने

# भ्रष्टाचाराचे आंधळे, निर्लज्ज समर्थन !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**भ्रष्टाचार हा स्वातंत्र्योत्तर भारतात समाजाचे आरोग्य बिघडवणारे जे अनेक रोग पसरले त्यातील एक अत्यंत गंभीर आजार आहे. तो कमी अधिक प्रमाणात सर्वच देशात आहे पण भारतात त्याचे ज्या प्रकारे संस्थांकरण झाले, ज्या प्रकारे त्याला लोकमान्यता आणि राज्य मान्यता मिळत गेली ते अधिक गंभीर आहे. सर्व प्रथम देशाचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी याबद्दल वक्तव्य केले होते. काळा बाजार करणारे, भ्रष्टाचार करणारे याना सार्वजनिक रित्या फाशी दिली पाहिजे असे त्यांचे वक्तव्य होते. अर्थात त्यांचे सर्वच समस्यांचे निराकरण भावनात्मक होते ! त्यामुळे भ्रष्टाचाराचा रोग संपला तर नाहीच पण त्या नंतर ३० वर्षांनी त्यांचाच नातू राजीव गांधी दिल्लीतील मी पाठवलेला १ रुपया पैकी गावापर्यन्त १० पैसे शिल्लक राहतो अशी खंत व्यक्त करण्यास बाध्य झाला.**

मधल्या काळात राजकारणी, सरकारी अधिकारी यांनी मिळून एक व्यवस्थाच निर्माण केली ज्यातून निवडणुका जिंकण्याचे एक तंत्र उभे राहिले. पैसा हा सत्ता मिळवण्यासाठी आणि सत्ता पैसे मिळवण्यासाठी या सूत्रातून भ्रष्टाचाराचे नवीन मापदंड उभे राहत गेले. अर्थात यात सामान्य माणसाची काय भूमिका होती ? त्याला अस्तित्वासाठी, जगातील स्पर्धेत टिकण्यासाठी या व्यवस्थेशी शरण जाणे क्रमप्राप्त होते.

जेंव्हा इंदिरा गांधींच्या काळात याची परिसीमा झाली तुलमोहन राम, नगरवाला सारखी प्रकरणे घडली, तेव्हा याला विरोध करण्यासाठी जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीची हाक दिली. नवनिर्माण आंदोलन उभे राहिले त्यातून जनतेच्या आशा पल्लवित झाल्या पण तो आनंद क्षणिक ठरला ! कालांतराने फेअर फॅक्स आणि बोफोर्स मुद्दे घेऊन विश्वनाथ प्रताप सिंग सत्तेवर आले पण भ्रष्टाचार थांबला नाही.

वैश्विकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार याने आमच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा जरी सावरला गेला असे वाटत असले तरी समाज जीवनात उपभोगवाद जो वाढला परिणाम स्वरूप भ्रष्टाचाराचे आकडे वाढतच गेले. मनमोहनसिंग सोनिया काळ म्हणजे याचा कळस होता. चिदम्बरम सारखे स्वतःला अर्थतज्ञ म्हणवणारे मंडळी यांनी एक टोळीच केली आणि देशाला लुटण्याचे काम केले. कोळसा, टू जी घोटाळा हे तर गाजलेच पण सध्या गाजत असलेला हेराल्ड किस्सा, बँकिंग भ्रष्टाचार या सगळ्याचे मासलेवाईक उदाहरण म्हणावे लागेल. या काळात खऱ्या अर्थाने भ्रष्टाचाराला प्रतिष्ठा मिळाली आणि दुर्दैव असे की ज्या अण्णांनी या विरुद्ध आंदोलन उभे केले त्यांच्याच शिष्यानी भ्रष्टाचाराचे नवीन फंडे निर्माण केले.

अलीकडच्या काळात ED, CBI किंवा अन्य तत्सम केंद्रीय संस्था जेव्हा असे राजकारणी, उद्योगपती यांच्या विरोधात कारवाई करायला लागली तर त्यात काहींना फक्त राजकारण दिसायला लागले आहे. या कारवाई बद्दल मोदी, शहा याना दूषणे देणारे, या कारवाया राजकारणाने प्रेरित आहे म्हणणारे कधी ही अशा छाप्यात सापडणाऱ्या पैशाबद्दल बोलत नाहीत. पार्थ चॅटर्जी, संजय राऊत, नवाब मलिक किंवा अन्य अनेक यांच्या घरात पैसे सापडतात ते कुठून आले हे स्पष्ट होत नाही आणि तरी ही कारवाई योग्य नाही म्हणणारे येथे निपजतात ! आम्ही विशिष्ट घरात जन्माला आलो म्हणजे आम्हाला कुठलेही उत्पनांचे स्रोत दाखवायची आवश्यकता नाही ! आम्हाला विलासी जीवन जगण्याची परवानगी आहे. गाड्या, ड्रायव्हर, हॉटेल्स, जमिनी, बंगले म्हणजे आमच्यासाठीच अशा प्रकारची उन्मत्त, उर्मट, उद्दाम वृत्ती सत्ता आणि भ्रष्टाचारातून जन्माला आली. सत्ता, भ्रष्टाचार आणि घराणेशाही असा अभद्र त्रिवेणी संगम स्वतंत्र भारताला शोषत होता.

२०१४ साली पंतप्रधान म्हणून आलेल्या मोदीजी यांना सत्तेच्या वर्तुळात १२ वर्ष आणि राजकीय क्षेत्रात २६ वर्ष झाली होती पण त्यांच्यावर त्यांचे विरोधक पण भ्रष्टाचाराचा आरोप करू शकत नव्हते. त्यांनी न खाऊं गा, खाने दुंगा या वाक्याचा आणि त्यांच्या आर्थिक योजनांचा तथाकथित अर्थतज्ञ चेष्टा करत होते. डिजिटल व्यवहार, जनधन योजना, नोट बंदी, GST हे सगळे विरोधकांचे टीकेचे मुद्दे होते पण सामान्य भारतीय याच योजनेचा लाभार्थी होता आणि त्यामुळेच तो सुखावत होता.

सध्या भारतात ED च्या ज्या काही कारवाया चालू आहेत त्याला लक्ष करून भ्रष्टाचाराच्या मुळ मुद्द्याला बगल देण्याचा निर्लज्ज उद्योग काही मंडळींनी सुरू केला आहे. ज्या पक्षाची निर्मिती मुळात भ्रष्टाचाराच्या निर्लमुनासाठी झाली त्यांच्या पक्षाच्या सत्येंद्र जैन या माणसाकडे बेहिशोबी पैसा सापडतो आहे.

बंगालमधील SSC परीक्षा प्रकरणात नाहक त्रासलेले विद्यार्थी आणि पालक, पत्राचाळीतील गरीब मध्यमवर्गीय भाडेकरी याना भरडून पैसे उभे करून मस्तवाल बनणाऱ्या राजकारण्यांना वठणीवर जर आणले जाणार असेल तर त्याचे स्वागत केले पाहिजे. एकेकाळी भ्रष्टाचाराचे विरोधात युक्रांद आंदोलन उभे करणारे खरोखरच सुमार बुद्धीने जेव्हा यावर टीका करतात तेव्हा

ही समस्या किती गंभीर बनली आहे याची कल्पना येते.

माधव गडकरी, गोविंद तळवलकर असे दिग्गज अंतुले, शिवाजीराव निलंगेकर, बाबासाहेब भोसले या मुख्यमंत्र्यांना सत्तेवरून घालवू शकले पण आज त्यांचेच वारसदार मोदींना विरोध करण्यासाठी घराणेशाही आणि भ्रष्टाचार याचे निर्लज्ज समर्थन करत आहेत. यातही एक सुमार बुद्धीचा कुमार आहेच. महाराष्ट्रात मधू दंडवते मृणाल गोरे यांचा वारसा सांगणारे कधीच भ्रष्टाचार्यांच्या मांडीवर जाऊन बसले आहेत.

हे पुरोगामी म्हणवणारे पत्रकार, विचारवंत निदान मोदी यांच्या स्वच्छ व्यक्तिगत जीवनाच्या नैतिक शक्तीचे स्वागत करतील याची सुतराम शक्यता नाही. कारण मोदींच्या नैतिक शक्तीचा जन्म हा या लोकांच्या न आवडणाऱ्या हिंदुत्वाचा कुशीत झाला आहे हे यांचे खरे दुःख आहे आणि उरलेल्यांचे उत्पन्नाचे साधन उध्वस्त झाल्यामुळे त्यांना अस्तित्वाचा प्रश्न आहे. हे सगळे असले तरी सामान्य जनता आनंदित आहे अगदी जसे नोटबंदी मध्ये रांगेत उभे राहूनही लुटारूंच्या वाम मार्गाने गोळा केल्या गेलेल्या संपत्तीची झालेली धूळधाण त्यांना सुखावत होती तसेच आज जेल मध्ये गेलेले पुढारी आणि चौकशीसाठी का होईना बोलावले गेलेले मॅडम, राजपुत्र, राजकन्या बघून तो सुखावत आहे. त्याला महागाईची चिंता आहे पण त्यासाठी तो सामान्य माणूस मोदीजी ना दोष देण्यास तयार नाही आणि हेच आंदोलनाचे नाटके करणाऱ्यांच्या लक्षात येत नाही.

देव करो आणि घराणेशाहीचा मोहजालातून ही मंडळी बाहेर पडो, अन्यथा जनतेने तर ठरवून टाकले आहे कुणाच्या पाठीमागे उभे राहायचे आणि हे मोदीजी यांचे पोस्टर्स लावून मते मागणार्यांनी पण लक्षात ठेवले पाहिजे कारण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात प्रत्येकाला स्वछतेच्या अभियानाचा प्रसाद मिळाल्या शिवाय राहणार नाही ! व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने देश एक आश्वासक, दमदार वाटचाल करू लागला आहे.

# निराधारांचा आधार...! : प्रा.दादासाहेब थेटे

आधुनिक केसरी



योगेश गुंजकर
संपर्क क्र. 7218786440

**माणसंच जीवन हे एक आयुष्यचं पान आहे. कोणाचं कसं तर कोणाचं छान आहे. प्रत्येक माणूस आपल्या पोटासाठी या सृष्टीवर काही न काही काम करत असतो. पोटाची खळगी भरण्यासाठी वणवण फिरत असतो. माणसांच्या गरजा या न संपणाऱ्या असतात. एक भागली की दुसरी तयार होते. स्वतःसाठी माणूस किती कष्ट करतो. आपलं भागल्यानंतर दुसऱ्यांचा विचार करत असतो. माणस हे आपल्या कर्तृत्वाने ओळखले जातात. असंच एक अंबड तालुक्यातलं समाजासाठी जीव झोकून देणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा.दादासाहेब थेटे सर होय....**



जमिनीचा कागद आणि आकाशाची शाही जरी केली तरी थेटे सरांचं कार्य न संपणार आहे. समाजाप्रती असलेली तळमळता ही त्यांच्या कार्यातून दिसून येते. आपल्या आजूबाजूला अनेक लोक असतात. दुःखी, कष्टी, अपंग, निराधार, एकटे, परके, शोषित, पीडित, उघडे, नागडे, कॅन्सर सारख्या, एड्स सारख्या दुर्दर आजाराने ग्रासलेले. अशा माणसांना मदतीचा, दयेचा हात देणारे थेटे सर होय...

समाजभान टीम च्या माध्यमातून अनेक गरजू लोकांना मदत केली आणि करत आहेत.

जालना जिल्ह्यात अंबड, घनसावंगी तालुकातले अनेक भटके मूल ज्यांच्या खांद्यावरचं भंगारचं ओझं नाहीस करून शिक्षणाच्या प्रवाहात आणलं. जे लोक झोपडपट्टीत राहतात त्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून 'वंचितांची दिवाळी' स्तुत्य असा उपक्रम समाजभान टीम ने राबवला. गरिबांच्या घरी जाऊन दोन गोड घास देणं आणि त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहणं हे कोणाच्याही नशिबी नसतं.

कोरोनाच्या काळात अनेक लोकांना अन्नाची आणि घरी जाण्याची व्यवस्था केली. केरळमध्ये, आसाममध्ये पूर परिस्थितीला समाजभान टीम धडाडीने पुढे सरसावली. गरिबांच्या संसाराला हातभार लावून थेटे सरांनी खूप पुण्य कमावलं असंच म्हणता येईल. जालू सारख्या मनोरुग्णाला त्यांनी परत आयुष्याचं दर्शन घडवलं. हरवलेली मानसं या पुस्तकातून अनेक प्रसंगांना वाट मोकळी करून दिली.

आज-कालच्या पिढीला एक आदर्श घ्यायचा असेल तर मला वाटतं की थेटे सरांसारखा अवलिया होणे नाही..! थेटे सरांसारखा माणसाला पाहिल्यावर मला नेहमी श्रद्धेय बाबा आमटे यांचं एक वाक्य आठवतं. 'जहाजाबरोबर स्वतःला बुडवून घेणारे कर्णधार जेथे असतात. तेथेच बुडता देश वाचविणार्या नाविकांच्या पिढया जन्म घेतात. वाट पाहणाऱ्या किनार्यांना व लाटांच्या उग्र कल्लोळाला कळू द्या, मी अजून जहाज सोडलेलं नाही आणि सोडणार पण नाही.' त्यांच्या कार्याबद्दल आणि समाजाप्रती असलेल्या जानिवाबद्दल हा केलेला विशेष लेखन प्रपंच....!

# कर्म-फळाच्या अपेक्षेनुसार व्यक्ती साहसी किंवा कमजोर ठरतो

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**कर्म करून फळाची अपेक्षा करणं या मध्ये गैर असं काहीच नाही. परंतु हिच अपेक्षा दुःखांच मुळं कारण ठरत असेल तर मग मात्र ही कठीण बाब आहे....? आणि असं होतं असेल तर मग यावर उपाय काय...?? हा देखिल प्रश्नच...??? म्हणून सर्वसाधारणपणे कर्तव्य म्हणून जो कर्म करून फळाची अपेक्षा बाळगत नाही. आणि फळ मिळालेच तर तो ते अगदी सहजपणे स्वीकारतो. आणि जर यदाकदाचित फळ मिळालं नाहीतर निराश-खिन्न होत नाही दुःख व्यक्त करत नाही. तो साहसी असतो. आणि या उलट जो कर्म करून फळाची अपेक्षा करतो. त्याला फळ मिळालं तर उत्तम. परंतु यदाकदाचित फळ नाही मिळालं तर मग मात्र तो खिन्न होतो. तणाव घेतो, दुःखी होतो. म्हणून कर्म करून फळाची अपेक्षा करतो तो कमजोर ठरतो. म्हणून सदैव साहसी असणं हे सुखी-समाधानी, आनंदी जीवनाचे लक्षण आहे.**

सुख आणि दुःख ह्या जीवनातील क्रमप्राप्तः घटना आहेत. पण आपण याकडे वरकरणी पाहुण चालणार नाही. तसेच आपण याच सखोल अध्यान ही करत नाही. म्हणून संसारीक जीवनातील सुख-दुःखाच्या वादळाचे तडाखे हे अनेकांना बसतात. आणि या तडाख्याने अनेक लोक कोलमाडुन जातात. मुळांत हे तडाखे बसु द्यायचे की नाही हे सर्वस्वी आपल्यवर अंवलबुन आहे. आणि म्हणून आपण शक्यतो साहसी असलेच पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत आपण कमजोर असता कामा नये. जर आपण कमजोर असू तर सुख-दुःखाची वादळ आपल्या जीवनरूपी नावेला पाण्यात वारंवार डुबवण्याचा प्रयत्न करतील. आणि म्हणूनच यामधुन आपली कायमची सुटका होण्यासाठी आपण साहसी होण्याची नितांत आवश्यकता आहे. काळाची गरज आहे.

जीवनातील प्रत्येक घडामोड आणि सुख-दुःख याचा आपल्या कर्माशी घनिष्ठ असा संबंध असतोच. कर्म म्हणजे नशीब वगैरे असं काही नाही. तर आपण जे-जे कार्य करतो. ते कार्य म्हणजेच वास्तविक कर्म आहे. आणि हेच कर्म आपल्या जीवनातील सुख-दुःख निश्चित करत असत. त्याची तीव्रता ठरवतं असतं. वास्तविक पाहता जीवनात कर्म हे अनिवार्य बाब आहे. म्हणून कर्म हे करावेच लागणार आहे. पण हे कर्म करत असतानाच जर जबाबदारी कर्तव्य म्हणून ज्ञानावरून निष्ठापुर्वक प्रामाणिक न्याय, सुसंगत कर्म करण्यासाठीच आपला जन्म झाला आहे. याची जाणीव, जागृती ही सदैव असली पाहिजे. आणि आपण मुळात हेच विसरतो. आणि मग इथंच आपण भरकटतो.

खऱ्या अर्थाने दुःखाची सुरुवात किंवा पाया इथंच रचला जातो. आणि बघताबघता कळस कधी पुर्ण होतो. ते कळत सुद्धा नाही. म्हणून दैनंदिन जीवन जगण्यासाठी कर्म करत असताना जागरूकता बाळगून कर्तव्य म्हणून कर्म केले. आणि आणि फळाची अपेक्षा केलीच नाही. तर दुःख आपल्याकडे फिरकाणार सुद्धा नाही. दैनंदिन जीवनातील विविध व्यवहारातील आणि दैनंदिन बाबींच्या अनुषंगाने प्रत्येक घटनेत-घडामोडीत-विषयामध्ये आपण आपलं कर्म करत असताना ते अगदी निष्ठापुर्वक पार पाडलं पाहिजे. आणि त्या कर्मातुन फळ मिळाले तर आनंदच आणि जर नाही मिळाले तरी सुद्धा आनंदच....! या पद्धतीने साहसी माणसं जीवन जगत असतात. म्हणुन साहसी माणसाच्या आयुष्यात दुःख आपलं स्थान निर्माण करू शकत नाही. आणि या उलट कमजोर व्यक्ती कर्म करण्याची सुरुवात केल्यापासूनच म्हणजे अगदी सुरुवातीच्या काळापासून फळाची अपेक्षा महत्वकांक्षा बाळगुन असतो. अणि मग जर फळ मिळाले नाही तर मग मात्र दुःख व्यक्त करतो. निराश होऊन हताश होतो.

निष्ठा पुर्वक कर्म करण हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे. कर्म केल्यानंतर फाळाची अपेक्षा साहसी व्यक्ती कधीही करत नाही. तो कर्तव्य म्हणून कर्म करतो. आणि फाळची अपेक्षा नसल्याने सुख-दुःख त्याच्या कडे फिरकत नाहीत. आणि त्यामुळे निसर्गातील कोणतीही शक्ती अशा व्यक्तीवर परिणाम करत नाही. अघात करू शकत नाही. तसेच भौतिक मोहाच्या जाळ्यात अशा व्यक्तींना खेचु शकत नाही. म्हणून कर्म करा पण फळ मिळेल किंवा नाही मिळेल. यामध्ये काही स्वारस्य बाळगु नका. तसेच कर्म करण्यामध्ये कोणताही निष्काळजीपणा करू नका. आपलं कर्म हेच आपल्या जीवनातील सुख-दुःखांच भुंकप केंद्र असतं. ते जेवढं संवेदनशील तेवढे धक्के जास्त. आणि म्हणून आपल्या जीवनातील सुख-दुःख निर्मितीचे शिल्पकार हे आपण स्वतःच आहोत हेही विसरून चालणार नाही. आपण कर्म करताना जो भाव निर्माण केला आहे. किंवा जो भाव ठेवाला आहे. त्यानुसार तसंच सुख-दुःख मिळणं हे निश्चित आहे. म्हणुनच साहसी व्यक्तिमत्त्व होऊन कर्म करा. आणि सुखी-समाधानी-आनंदी-निरोगी जीवन जगण्याचा प्रयत्न करा. हेच जीवनातील महत्वपूर्ण ज्ञान आहे. म्हणून कर्म फलापेक्षा निसंदेह कर्म करा. ज्ञानयुक्त कर्म करा. ताणतणाव मुक्त होऊन सकारात्मक पद्धतीने जीवनाच्या वाटेवर मार्गक्रमण करण्यासाठी साहसी पद्धतीने पुढे चालण्यासाठी ज्ञान हे शास्त्र महत्वपूर्ण आहे.....!!

# अनुभव आणि जाणिवांची प्रचिती



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**माणसाचं आयुष्य म्हणजे ऊन -सावलीचा खेळ असतो. सुख-दुःख एकामागून येत असतात. जगी सर्वसुखी असा कोणीही नाही. आयुष्यात अनेक घटना मग त्या चांगल्या असो की वाईट घडत असतात. सुखाने पागळून जायचे नाही आणि दुःखाने कोसळून जायचे नाही. प्रत्येक घटनेकडे तटस्थपणे पाहता यायला हवे. माणसाला वर्तमानात जगता आले पाहिजे. समाजात वावरताना याच घटना किंवा एखादा प्रसंग कथेचं स्वरूप धारण करतात आणि साहित्यात उतरतात. कथानक, घटना -प्रसंग, काळ, पात्रे, संवाद, आशय, वातावरणनिर्मिती यांच्या मिश्रणाने कथा गुंफली जाते. कथेचे विविध प्रकार आपणास माहीत आहेत. काही कथा ह्या काल्पनिक असतात, काही जीवनाचे खरे दर्शन घडवणाऱ्या असतात.**

लेखिका शुभांगी पासेबंद यांचा 'ही वाट दूर जाते' हा कथासंग्रह जीवनाची सत्यता मांडणारा आहे, हे वाचल्यानंतर जाणवले. चेतक बुक्स प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ह्या कथासंग्रहात एकूण २२ कथांचा समावेश आहे. वेगवेगळे विषय, विविध पात्रे, त्यांची संवादशैली, या पात्रांच्या संवादातून उलगडत जाणारे कथानक आणि त्यातून मिळणारा संदेश यामुळे ह्या कथा वाचताना पुढे काय याची उत्सुकता वाढत राहते.

वाचकांना कथेत गुंतवण्याची कला लेखिकेने उत्तमरित्या सांभाळली आहे. लेखिका शुभांगी पासेबंद यांचे हे २७ वे पुस्तक आहे, यावरून त्यांच्या लेखणीच्या अनुभवाची आणि जाणिवांची प्रचिती येते. या कथासंग्रहातील कथा वाचताना एक गोष्ट जाणवते की, मानवी स्वभावाचे बदलते रूप, धरसोड वृत्ती, नात्यांमधील हरवलेलं प्रेम असे संवेदनशील विषय लेखिकेने हाताळले आहेत. खासकरून ज्येष्ठा नागरिकांच्या मनःस्थितीची जाणीव, त्यांच्या भावभावना, त्यांची मते या कथांतील पात्रांतून व्यक्त होताना दिसतात. पुस्तक वाचल्यानंतर जाणवते की, हे असे प्रसंग- घटना कुठेतरी आजूबाजूला घडताना कधीतरी पाहिले आहेत पण त्यावर विचारविनिमय कोणीही करत नाही. या कथासंग्रहाच्या निमित्ताने हे गंभीर विषय प्रकाशात येतील. प्रथमपुरुषी निवेदन आणि पात्रसंवाद यातून कथा फुलत जाते.

या कथासंग्रहातील 'डस्टबीन ' कथेत ज्येष्ठ बायका आणि अविवाहित मैत्रिणीच्या संवादातून त्यांच्या आयुष्यातील प्रश्न, दुःख मांडताना दिसतात. घरातील वृद्ध व्यक्ती ह्या डस्टबीन नसून घराचा आधार असतात. या कथेतील ह्या बायका आपआपल्या घरी कसे गपचूप पडून जगत असतात हे चित्र या कथेतून उभे केले आहे. बदललेली मानसिकता, वृद्ध म्हणजे अडगळ ही समजूत, ज्येष्ठांचं बाहेर विरंगुळा शोधणं, नात्यामधील अबोला, अपुरा संवाद ह्या गोष्टी, यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या या कथातून मांडल्या आहेत.

आयुष्य जगताना नात्यांमध्ये आकडेमोड करू नये, याची प्रचिती देणारी 'आकडेमोड' ही कथा आहे. कोणत्याही कारणाने कोणत्याही व्यक्तीमध्ये न गुंतता तटस्थपणे जगणारे गंगा हे पात्र 'तुझे माझे जमणार नाही' या कथेत भेटते. नात्यांमधील धरसोड वृत्ती सर्रास आजूबाजूला दिसते.

'कामापुरता मामा' म्हणा हवे तर ! कामापूरता संबंध जोडणारे गंगा हे पात्र असे का वागते, त्यामागचे कारण काय ? यासाठी ही कथा नक्की वाचा.


'मला काय कमी' या कथेतून मुलांची लाडकी मम्मी असलेल्या आईला वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येते, आई-वडील, मुले यांच्यातील तो आपलेपणा का हरवत जातो, हा प्रश्न निर्माण करणारी ही कथा आहे. ज्या आईने अपलीलाआ जन्म दिला, लहानाचं मोठे केले, चांगले संस्कार दिले, तीच मुले त्या आईला वृद्धाश्रमात जायला सांगतात.

हे वास्तव आहे. मतभेद हे असतातच म्हणून हा पर्याय निवडण्याकडे तरुण विवाहित मुलांचा कल का असतो ? यावर लेखिकेने भाष्य केले आहे.

जीवनातील एकाकीपण ही ज्येष्ठांची गंभीर समस्या आहे, हीच समस्या लेखिकेने या कथासंग्रहातून अधोरेखित केली आहे.

गेली अनेक वर्षे घरात लहान बाळ यावे, यासाठी आतुरतेने वाट पाहणाऱ्या संघे कुटूंबाची स्वप्ने कशी धुळीस मिळतात, याची करूण कहाणी 'वंशवेल' कथेतून सांगितली आहे. या आणि इतर कथाही बोध देणाऱ्या आहेत. संवेदनशील आणि तितक्याच विचार प्रवृत्त करणाऱ्या ह्या कथा वाचनीय आहे.

'ही वाट दूर जाते' हा कथासंग्रह मानवी भावनांचं उत्तम प्रकटीकरण करणारे आहे. आजकालची सत्य परिस्थिती त्यांनी कथांमधून विशद केली आहे. हा कथासंग्रह नक्की आपल्या संग्रही असू द्या !




# मैत्री म्हणजे...?



रुपाली वागरे/वैद्य
संपर्क क्र. ९८६०२७६२४१

आधुनिक केसरी

**मैत्री आणि प्रेमात जर काही श्रेष्ठ असेल तर ती असते मैत्री कारण मर्यादेच्या साखळदंडात जखडलेल प्रेम अमर्याद मैत्रीच्या अस्तित्वात नेहमीच कमी पडते. तुमच्या सुखात नेहमीच हजर न राहता दुःखात मात्र पाठीराखा होऊन कायम सोबत करतो तोच खरा मित्र. नेमक्या वेळी शब्दही सुचत नसताना सगळं समजून घेते ती मैत्री. मैत्री हा आपल्या एकटेपणावरचा एक उपाय आहे. मैत्री हे एक सकारात्मक कर्म आहे.**

पौराणिक कथांमधील मैत्री पाहताना डोळ्यासमोर ऊभे राहतात ते... श्रीराम चन्द्र आणि बिभीषण, श्रीकृष्ण आणि सुदामा तसेच कर्ण आणि दुर्योधनाची मैत्री, कवी कलश आणि छत्रपती संभाजी महाराज, पृथ्वीराज चौहान आणि चांदबरदाई, शिवाजी महाराजांच्या मैत्री खातर प्राणपणाला लावणारे तानाजी... मैत्रीच्या व्याख्येमध्ये परीपूर्णतेने बसतात.

मित्र म्हणजे एक आधार, एक विश्वास, एक आपुलकीच झाड असतो, मैत्रीही एखाद्या अनमोल रत्नासारखीच असते ज्यावर आनंदाचे, समजूतदारपणाचे, विश्वासाचे पैलू पडले की तिची किंमत वाढते. म्हणून खरी मैत्री जपायला हवी कारण अशी मैत्री मिळायला खूप भाग्य लागत. श्वासाठी आवश्यक असणारा मित्र एक प्रकारचे ऑक्सीजन असतो. कारण, "मैत्री" हा शब्द अनेक अर्थाचे पैलू ऊलगडतो, मैत्री म्हणजे हळव्या नात्याचा ऋणानुबंध. मैत्री म्हणजे मन मोकळ करण्याची हक्काची आणि विश्वासाची जागा. मैत्री एक निस्वार्थि नात, एकमेकात गुंतलेल... मैत्रीच्या पंखावर अलगद जपलेल. मैत्र जीवाचे... प्रीत फुलांचे, मैत्री पावित्र्याचा अविष्कार... मैत्री धुंद मनातला मूक होणार... मैत्री म्हणजे अनमोल भक्तीभाव... मैत्री म्हणजे जगण्याच सामर्थ्य... मैत्रीत नसावा स्वार्थ... मैत्री म्हणजे आयुष्याचे इंद्रधनूष्यी रंग... मैत्रीचे नाते म्हणजे श्वास आणि आयूष्याचे... समूद्र आणि लाटांचे, मैत्री म्हणजे दोन मनाला जोडणारा धागा, मैत्री म्हणजे चैतना, मैत्री म्हणजे उल्हास, मैत्री म्हणजे त्याग, मैत्री म्हणजे विश्वास, मैत्री म्हणजे सूखद क्षणांची बरसात. मैत्रीत असते एकमेकांसाठी जगण्याची आस. मैत्री म्हणजे रेशमी बंध... मैत्री असते स्वंच्छदी फुलपाखरासारखी, मनसोक्तपणे बहरलेल्या वसंतासारखी, मैत्री असावी पिंपळपानासारखी निरंतन जपून ठेवावीशी वाटणारी. या मैत्री मध्ये जात, धर्म, पंध, वय याच बंधन नसत... कारण, मनाशी मन जुळले की ह्यदयाच्या तारा अलगद छेडल्या जातात. त्यावेळी माया, ममता, विश्वास त्यागाच्या वेलीवर धुंधपणे बहरते, मोहरते, आयूष्याच्या या खडतर मार्गात एकमेकांना एकमेकांची साथ मिळते. मैत्री असावी नजरेत भरणारी, मनात सामावणारी, हवीहवीशी वाटणारी, सागराहूनही खोल, ज्योती सारखी प्रकाशित निरंतर तेवणारी, कधी न तूटणारी, मनामनात खोलवर दडलेली. अगदी खरी आणि निस्वार्थि मैत्री लाभायला खरच खूप मोठ भाग्य लागत आणि ज्यांना खरचं निस्वार्थि मैत्री लाभली ते खरच भाग्यवान असतात. मैत्री दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!



# सुभाष किन्होळकरांचा बाल काव्यसंग्रह 'फुलपाखरे आहोत आम्ही'

आधुनिक केसरी

**साहित्यिक सुभाष किन्होळकर यांच्या लेखणीतून साकारलेला 'फुलपाखरे आहोत आम्ही' हा बालकाव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला. बालकुमारांचं संस्कारासह मनोरंजन करणाऱ्या बाल साहित्यिकांना त्यांनी तो अर्पण केला आहे. 'क्लेव्हर फॉक्स' या राष्ट्रीय स्तरावरील प्रकाशन संस्थेने तो प्रकाशित केला आहे. 21 कविता असलेल्या काव्यसंग्रहाला पन्नास पाने आहेत.**

मुलांसाठी खास मोठी आणि ठळक अक्षरे व प्रत्येक पानावरील कृष्णधवल छायाचित्रे ही या काव्यसंग्रहाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. कवी सुभाष किन्होळकर यांनी थोडक्यात आपले मनोगत या काव्यसंग्रहात मांडले आहे. 'बालकांच्या सानिध्यात रोजचा वावर असल्यामुळे त्यांच्या मनाचा मला ठाव घेता आला. त्यातून फुलपाखरे आहोत आम्ही हा बालकवितासंग्रह साकारला', असे त्यांनी लिहिले आहे. या बालकविता खरोखरच बालपणाचा शोध घेतात.

**वळण वाटा तुडवत आम्ही**
**चढतो डोंगरकडा**
**इकडे तिकडे हिंडून खूप**
**फुलांशी लावतो लळा**

अशी साधी आणि सरळ काव्यरचना या संग्रहात आहे. मुलांच्या भावविश्वात चित्र, परी, पुस्तके, आई, सणवार, पशुपक्षी, आकाश आणि सवंगड्यांचं महत्त्व असते. हा धागा पकडून त्या विषयावर या काव्यसंग्रहात रचना आहेत. कुठेही कठीण शब्द नाहीत. समूहाने गाता येतील आणि ओठांवर ठरतील अशाच काव्य ओळी आहेत.

**निळी परी परी**
**ड्रेस निळा निळा**
**निळ्या निळ्या रंगाचा**
**भारी तिला लळा**
**(परीची निळी कहाणी)**

असं परीचं विश्व कवीच्या लेखणीतून उतरले आहे. भरारी नावाची कविता अशाच पद्धतीने पाखरांना उभारी देणारी तशीच बालकांसाठी प्रेरणादायी आहे.

**'घे भरारी उंच पाखरा**
**घे भरारी रे**
**गाठ ध्येयाचे शिखर तू**
**घे भरारी रे**

या छोट्या छोट्या रचना मुलांना नक्कीच आवडतील. मोठ्यांनी छोट्यांसाठी लिहिताना त्यांच्या संस्कारक्षम मनावर सकारात्मक परिणाम होतील कशी रचना करायची असते याचे चांगले भाण किन्होळकर यांना आहे. लहान मुलांवर कडवट संस्कार रुजले की, त्यांच्यात समस्या निर्माण होतात. कवी सुभाष किन्होळकर यांच्या या काव्यसंग्रहात कुठेही अंधश्रद्धा व दैववादी मजकूर नाही. त्यांच्या कविता मुलांना मनोरंजनासोबत सहजीवनाचे महत्व पटवितात. 'आनंदाच्या तऱ्हा' ही कविता छोट्यासह मोठ्यांनाही





आनंद देते.

**कोणी लिहितो छान कविता**
**कोणी काढतो सुंदर चित्र**
**पेरूनी मनी ओला जिव्हाळा**
**कोणी जमवतो**
**कुणी जमवतो नाना मित्र**

बुलडाणा जिल्ह्याच्या साहित्य विश्वात खुप प्रतिभावंत आहेत. सुभाष किन्होळकर हे कवी, कादंबरीकार आणि प्रयोगशील शिक्षक आहेत. आपला मौल्यवान वेळ ते लेखन कार्यासाठी देत आहेत. यातून त्यांचे बरेचसे साहित्य प्रसिद्ध झाले आहे. प्रस्तुत काव्यसंग्रह 'फुलपाखरे आहोत आम्ही' मध्ये किन्होळकर यांनी सुंदर कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या हातून यापुढेही अशाच सुंदर साहित्यकृती येत राहो यासाठी खूप खूप शुभेच्छा!

**रवींद्र साळवे,**
**साथी 20, सहजीवन सोसायटी, खामगाव रोड,**
**मारुती शोरूमच्या बाजूला, सुंदरखेड बुलडाणा**
**मो. 9822262003**




आधुनिक केसरी

## चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

**अ) गणिताची मूलभूत संकल्पना :** संख्यांचे प्रकार


5) समसंख्या : ज्या संख्यांना २ ने पूर्ण (निःशेष) भाग जातो, त्यांना समसंख्या म्हणतात.
उदा. 2, 8, 30, 42, 56, 44.

6) क्रमागत समसंख्या : दिलेल्या लगतच्या समस्यांमध्ये "2" असतो, अशा संख्यांना क्रमागत समसंख्या म्हणतात.
उदा. 2, 4, 6, 8, 10, 12, 14, 16 .... इत्यादी.

7) विषमसंख्या : ज्या संख्यांना "2" ने भागले असता बाकी "1" उरते पूर्ण (निःशेष) भाग जात नाही, त्या संख्यांना विषमसंख्या म्हणतात.
उदा. 5, 9, 21, 37, 43 ..... इत्यादी.

8) क्रमागत विषमसंख्या : दिलेल्या लगतच्या विषमसंख्यांमध्ये "2" चा असतो, अशा संख्यांना क्रमागत विषमसंख्या म्हणतात.
उदा. 1, 3, 5, 7, 9, 11, 13 .... इत्यादी.

लक्षात ठेवा : 1) समसंख्यांच्या एककस्थानी 0, 2, 4, 6, 8 यापैकी कोणताही एक अंक असतो.
2) विषमसंख्यांच्या एककस्थानी 1, 3, 5, 7, 9 यापैकी कोणताही एक अंक असतो.




3) दोन क्रमागत समसंख्यांतील फरक "2" असतो.
4) दोन क्रमागत विषमसंख्यांतील फरक "2" असतो.
5) तीन क्रमागत विषम संख्या आणि तीन क्रमागत विषमसंख्या यांना मधल्या संख्येच्या पुढची संख्या "2"ने मोठी (जास्त) असते. आणि आधीची संख्या "2"ने लहान (कमी) असते.

**ब) गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच :**
**प्रश्न : जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) समसंख्या - | अ) (14, 16, 18) |
| 2) विषमसंख्या - | ब) (5, 7, 9) |
| 3) क्रमागत समसंख्या - | क) (9, 13, 27) |
| 4) क्रमागत विषमसंख्या - | ड) (8, 22, 36) |

**उखाणा :**
1) बाप शब्दाचा समानार्थी शब्द आहे तात,
"2" ने पूर्ण भाग जाणाऱ्या समसंख्या असतात.
2) पोपट शब्दाचा समानार्थी शब्द आहे शुक,
विषमसंख्यांना "2"ने भागल्यानंतर बाकी उरते एक.

**ड) कविता : क्रमांक 7**

**(क्रमशः)**



## केंद्र सरकारच्या नीती विरोधात काँग्रेसच्या वतीने आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** तालुका व शहर काँग्रेस कमेटीच्या वतीने दि.५ ऑगस्ट रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको करून राज्यव्यापी जेलभरो आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या नितीच्या विरोधात प्रदर्शन कार्यकर्त्यांनी नारेबाजी केली. महागाई, बेरोजगारी, अग्निपथ योजनेसह जीवनावश्यक वस्तुवरील वाढलेली जीएसटी विरोधात पुसद काँग्रेस कमेटी वतीने प्रदेश काँग्रेस कमेटीचे सचिव डॉ. मोहम्मद नदीम यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले.
आंदोलनामध्ये तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अजय पुरोहित, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ज़िया शेख, काँग्रेसचे महासचिव सैयद इस्तियाक, जिला सचिव ॲड.गजानन देशमुख, जिल्हा अल्पसंख्याक उपाध्यक्ष अमजद खान, युवक विधानसभा अध्यक्ष अभिलाष खैरमोडे, किशोर राठोड, माजी नगरसेवक समद कुरेशी, विधानसभा अध्यक्ष नईम इजारदार, अल्पसंख्यक शहर अध्यक्ष नन्हे खान, प्रसिद्धी प्रमुख रोहन कांबळे, शहर युवक अध्यक्ष सोहेल चौहान, सैयद जानी, वसीम खान, गोपाल राठोड, गजानन इंगोले, जब्बार लाखे, विठ्ठलराव दुपरते, संतोष अंभोरे, शेख अशफाक, मुश्ताक़ भाई बर्तनवाले, सागर भिसे, सागर देशमुख, साजुबाई कांबळे, लीलाबाई कांबळे, प्रकाश मड़के, मो. जुनेद शेख़, देवीदास भालेराव, जाकिर जिन्दरण, जावेद समोती, भीमराव बेहड, शेखर कराडे, श्रीराम उचड़े, अरुण डोंगरे, उदाराम देवासी, बाबूलाल सढमाके, बालू पुलाते, विनोद राठौड़, सैय्यद सादिक, जफर अली, सलीम, कौशल्याबाई कराडे, रूपालीताई इंगोले यांच्यासह विविध सेलचे पदाधिकारी व पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते.

## अण्णाभाऊंचे साहित्य विश्वाला प्रेरणा देणारे : मानकर

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील कोहिनुर हिरा म्हणून अण्णाभाऊ यांच्याकडे बघितले जाते. त्यांनी कामगारांना न्याय देण्यासाठी आणि वंचित, शोषित, पिडीत वर्गाचा संघर्ष आपल्या वास्तववादी लिखाणातून मांडला आहे म्हणून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केलेले साहित्य अत्यंत विपुल असून ते देशाला आणि समाजाला एक प्रेरणा देणारे साहित्य आहे, असे प्रतिपादन मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी अध्यक्षीय भाषणात आमठाणा येथील साहित्यरत्न अण्णाभाऊंच्या 102 व्या जयंतीनिमित्त केले.
याप्रसंगी व्यासपीठावर सरपंच अरुण मोरे, व्याख्याते सागर गवते, काकासाहेब मोरे, अनिल खरात, गजानन मानकर, भरत मानकर, सुरेश चंदनशिव, एकनाथ आघाम, दगडू रायटे, संतोष उनोने, अंबादास जाधव, भाले सर, काकडे सर, रमेश उनोने, श्रीरंग चंदनशिव आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते तथा वेणूताई वृद्धाश्रमाचे अध्यक्ष साहेबराव दणके यांनी केले तर आभार गजानन जाधव यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विलास जाधव, उपाध्यक्ष सखाराम भिसे, सचिव बबलू नाडे, गजानन जाधव प्रभाकर जाधव, दुर्गादास जाधव, मनोज जाधव, साळूबा जाधव, संजय भिसे, बाळू जाधव, बबन जाधव, शिवाजी जाधव, संतोष जाधव, ईश्वर जाधव, गणेश जाधव यांचेसहित उत्सव समितीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमात कोमल पारखे या विद्यार्थिनीने अण्णाभाऊ बद्दल आपले विचार व्यक्त केले तर कल्पना उनोने, दिपाली उनोने, शितल काळे या विद्यार्थिनींनी गीत गायन केले. सदरील कार्यक्रमासाठी समाजबांधव व भगिनींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



## डाभा "घरोघरी तिरंगा" झेंडा उपक्रमातंर्गत तिरंगा झेंडा सहभागी व्हावे : राहुल हेलोडे

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील डाभा आजादी का अमृत महोत्सवाला ७५ वर्षे पूर्ण होत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दि.१३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत "घरोघरी तिरंगा" हा उपक्रम डाभा ग्रामपंचायत कार्यालयात राबविण्यात येणार आहे. नागरिकांना योग्य दरामध्ये झेंडा विकत घेता यावा यादृष्टीने जिल्हाभरात व सोयगाव तालुक्यात झेंडा विक्री केंद्र सुरु करण्यात येत असुन डाभा ग्रामपंचायत कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या तिरंगा झेंडा विक्री केंद्राचा शुभारंभ सरपंच राहुल हेलोडे, उपसरपंच विद्याताई दांडगे व ग्रामसेवक प्रदीप पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आला. यावेळी ग्रामसेवक प्रदिप पाटील सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी सर्व ग्रामपंचायत सदस्य, ईश्वर शेळके, विठ्ठल दांडगे, प्रा.मदनभाऊ डोखळे, शालिकराम पवार, ईश्वर पाटील, शिक्षकवर्ग आदींची उपस्थिती होती.
डाभा ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात सुरु करण्यात आलेले झेंडा विक्री केंद्र हे सुट्टीचे दिवस वगळता सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत सुरु राहणार असून प्रती झेंडा ३० रुपये एवढी किंमती असणार आहे. डाभा येथील नागरिकांनी दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत आपल्या घरावर तसेच प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या कार्यालयाच्या इमारतीवर तिरंगा फडकवून या महोत्सवात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविण्याचे आवाहन राहुल हेलोडे यांनी यावेळी केले.

## सर्व नागरिकांनी 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी व्हावे : विठ्ठल चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**देव्हारी :** भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत आहेत, या गौरवशाली पर्वानिमित्त देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. त्यानिमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती लक्षात राहाव्यात व देशभक्तीची भावना कायमस्वरूपी मनात रहावी व त्यासाजे संस्मरण व्हावे 11 ते 17 ऑगस्ट 2022 रोजी हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. देव्हारीमधील 100 टक्के नागरिकांनी आपल्या घरावर राष्ट्रध्वज लावत या अभिमानाच्या अभियानात सहभागी व्हावे, असे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल चव्हाण यांनी देव्हारी गावातील युवा पिढी ना व प्रतिष्ठित नागरिकांना आवाहन केले आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दीपगंगा भागीरथी संस्थेकडून शालेय साहित्य वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सांगली :** बागणी ता. वाळवा येथे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०२ व्या जयंतीचे औचित्य साधून दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, सांगली महाराष्ट्र राज्य या नोंदणीकृत राष्ट्रीय संस्थेकडून जिल्हा परिषद शाळा नं १ आणि २ तसेच बागणी व बागणी पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून, अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. किमान ३५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.
साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, सत्यशोधक विचार मंच आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंच बागणी यांनी आयोजित केलेल्या भव्यदिव्य जयंती सोहळ्याच्या महेश बावडेकर यांचे व्याख्यान झाले. दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे म्हणाले की, बागणी ही माझी जन्म व कर्मभूमी आहे. मी इथल्या पांढरीत जगलो, वाढलो, शिकलो आणि आज एक साहित्यिक, समाजसेवक म्हणून अस्तित्वात आलो. येथील प्रत्येक माणसांबद्दल माझ्या हृदयात मायेचा उम्हाळा आणि नाळेच एक अतूट नातं जोडलं गेलं आहे. त्यामुळे मी सदैव प्रत्येकांच्या ऋणात रहाणं पसंत करतो. सदर कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हा परिषद सदस्य संभाजी कचरे आणि बागणी गावचे विद्यमान सरपंच संतोष घनवट यांचे शुभहस्ते झाले. उपसरपंच विष्णू किरतसिंग आणि सदस्य सतीश थोरात तसेच समाजसेविका शारदा लोंढे, जिल्हा परिषद शाळा बागणी नं. १ चे वरिष्ठ मुख्याध्यापक गोपीनाथ आडके, शाळा नं. २ च्या मुख्याध्यापिका सुरेखा पाटील आणि सर्व शिक्षक स्टाफ, कर्मचारी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अक्षय थोरात, भास्कर थोरात, सत्यशोधक विचार मंचचे सदाशिव वारेसर, रामदास थोरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंच बागणीचे सर्व मान्यवर पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या उपक्रमाला प्राचार्य डॉ.डी.जी. कणसेसर, अनिल भाले, राहुल नाईक, अर्चना मॅडम, सुमेधा दिवाण, समीक्षा कांबळे, नेहा महामुनी, अक्षय माळी, सिया शहा, अभय चौगुले यांचेकडून मदत मिळाली. आयोजकांनी लोंढे दाम्पत्यांचा भव्य सत्कार केला. उपस्थित सर्वांचे आभार मानले.



आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# शिऊरमध्ये जनसागर लोटला; सप्ताह अनुभवण्यासाठी हजारो भाविक दाखल

## ९ चुलांगणाच्या माध्यमातून रात्रंदिवस सुरू महाप्रसादाची तयारी, ११११११ किलो साखरेपासून तयार होतोय महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज

**शिऊर :** वारकरी संप्रदायाचे केंद्रबिंदू असलेल्या श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या २७७ व्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने शिऊर गावात जनसागर लोटला आहे, हा ऐतिहासिक सोहळा आपल्या डोळ्यात साठवून घेण्यासाठी राज्यभरातुन भाविक शिऊर येथे येत आहे.

ज्ञानदानासोबतच अन्नदानाचा विशेष लौकिक असलेल्या श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या २७७ वा फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह स्वामींच्याच समाधी प्रांगणात होत आहे, सोबतच मंदिर जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले असून या अखंड हरिनाम सप्ताहाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. राज्यातील नामवंत कीर्तन प्रवचनकारांचे कार्यक्रम होत असून दिनांक ९ रोजी संस्थानचे उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार आहे. तब्बल ११११११ किलो साखरेपासून महाप्रसाद तयार केला जात असून २४ तास महाप्रसाद तयार करण्याचे काम सुरू सोबतच ज्ञानदान व अन्नदानाचा जागर सुरू आहे.

सप्ताहप्रसंगी गावातील परिसरातील सर्वधर्मीय समाजबांधव हजेरी लावत असून असंख्य भाविक शिस्तीत महाप्रसाद घेत आहे. सप्ताहातील गर्दी डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली असून अबालवृद्ध पासून ते वृद्धापर्यंत सर्वांनी हिरारीने सहभाग घेत भोजन वितरणासाठी पुढाकार घेतला. महिलांची, महाविद्यालयीन तरुणींची उपस्थिती लक्षणीय दिसायला मिळाली. एकाच वेळी तब्बल १० हजारहून अधिक भाविकांनी सोबतच रांगेत, शिस्तीत भोजन केले. कार्यक्रमासाठी दैंनदिन रूपरेषेत अनेक मान्यवर भेट देत असून सप्ताहाचे सुंदर नियोजनाचे कौतुक करत आहेत. महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांच्या सुमधुर वाणीला श्रवण करण्यासाठी श्रोत्यांची मांदियाळी बघायला मिळत आहे. शिऊर परिसर हरीनामाने दंग झाले असून सप्ताह मंडपात प्रवेश केल्यानंतर स्वर्गीय आनंदाची अनुभूती झाल्याची भावना भाविक व्यक्त करत आहेत.



**मानवी मूल्ये प्राप्त होण्यासाठी अखंड हरीनाम सप्ताह उत्तम माध्यम : ह.भ.प बंडोपंत लाखेस्वामी**

सर्व मानवी मूल्ये प्राप्त होण्यासाठी अखंड हरीनाम सप्ताह उत्तम माध्यम असून महाराष्ट्रात वारकरी सांप्रदाय फार मोठा आहे. या सांप्रदायामुळेच महाराष्ट्रात सामाजिक स्थिरता मानसिक स्वास्थ व सामाजिक सदभाव टिकून असल्याचे प्रतिपादन श्री संत शंकरस्वामी महाराजांचे वंशज ह.भ.प बंडोपंत लाखेस्वामी यांनी केले. महाराष्ट्र राज्याला संत महात्म्ये, अखंड हरीनाम सप्ताहाची व वारीची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. अखंड हरीनाम सप्ताह म्हणजे महाराष्ट्राला मिळालेली अनमोल देन होय, ही परंपरा २७७ वर्षापासून चालत आलेली आहे. स्वामींच्या सप्ताहाचा राज्यात लौकिक असून येथील अन्नदान विशेष असल्याचे बंडोपंत महाराज म्हणाले.

या हरीनाम सप्ताहमुळे जनतेच्या मनात, आचरणात, विचारात, संयम, शांतता, सामज्यसता, धर्मभावना, सहकार्य, सदभाव, सद्वविचार, सत्संग, सांस्कृतिक मुल्ये, नैतिक मुल्ये जोपासण्यासाठी मंगल देणगी मिळते. संताची शिकवण आचरण्यात आणण्यासाठी प्रोत्साहन मिळते. या माध्यमातून ज्ञानामृताचा लाभ होतो. त्यातून भक्तीचा अंकुर फुटून मानवी जीवनाची कृतार्थता साध्य होते. समाजात मान मान्यता त्यामुळेच टिकून आहे, हा सप्ताह म्हणजे अद्‌भुत आनंद सोहळा होय. या सप्ताहाचे आयोजनात सर्व जाती, धर्म, पंथ व समुदायांचा हातभार लागतो. या भव्य व दिव्य कार्यात समाजातील सर्व नागरिक सहभागी होत असल्याने सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होत असल्याचे बंडोपंत महाराज लाखेस्वामी म्हणाले.





# वर्षभरापूर्वी बांधण्यात आलेली विहीर मुसळधार पावसात ढासळली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील वरखेडी शिवारात रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकरी जगदीश निकम यांची विहीर ढासळली आहे. विशेष म्हणजे शेतात ग्रामीण हमी योजनेच्या अंतर्गत २०११-२०१२ या वर्षात सिंचन विहीर बांधण्यात आली होती. रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे ही विहीर पूर्णतः खचल्यामुळे जमीनदोस्त झाली आहे. या घटनेबाबत गावातील तलाठी यांना अनेकदा संपर्क करूनही त्यांनी फोन न उचलल्याने शेतकऱ्याने रोष व्यक्त केला आहे. मदत जाहीर न झाल्यास विष प्राशन करणार असल्याचा इशाराही या पिढीत शेतकऱ्यांने दिला आहे. प्रशासनातर्फे ग्रामीण हमी योजनेचा मोठ्या प्रमाणात गाजावाजा करण्यात आला. मात्र निकृष्ट बांधकामामुळे या योजनेचा तीन तेरा वाजलेले या ठिकाणी दिसून येत आहे. यावर्षीच्या पहिल्याच मुसळधार पावसामध्ये विहीर पूर्णतः जमीनदोस्त झाली आहे. या घटनेची माहिती कळताच शेतकऱ्याचे अश्रू देखील अनावर झाले होते. तलाठी यांना संपर्क करूनही त्यांनी फोन न उचलल्याने शेतकऱ्याने रोष व्यक्त केला आहे तसेच मदत न मिळाल्यास विष प्राशन करण्याचा इशाराही शेतकऱ्यांने दिला आहे.

# विहिरीत पडलेल्या मादी बिबट्याची सुखरूप सुटका

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मौजे आठेगाव येथे काल दि. 5 रोजी दुपारच्या सुमारास शेतकरी संदीप माणिकराव साबळे यांचे मालकी गट क्रमांक 09 मधील वीटाने बांधलेल्या जुन्या खोल विहीरीत एक मादी (वय अंदाजे दीड वर्षे) बिबट्या विहिरीत पडल्याची माहिती स्थानिकांकडून प्राप्त होताच त्यावर एस.व्ही. मंकावार उपवनसंरक्षक औरंगाबाद प्रा., सचिन शिंदे सहाय्यक वनसंरक्षक कन्नड यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी रोहिणी साळुंखे वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड प्रा. विजय इटवले पशुवैद्यकीय अधिकारी, आर.डी. पठाण वनपाल जामडी घाट यांच्यासह वनरक्षक एम.ए. शेख, एस.एम. माळी, एन.टी. ताठे, दामू पवार, अमोल वाघमारे, विलास सपकाळ, वनसेवक अशोक आव्हाड यांनी घटनास्थळी सर्व परिस्थितीचा आढावा घेत दोरी, पिंजरा, उपलब्ध साधन सामग्री वापरून मोठ्या शिताफीने मादी बिबट्या वन्यप्राण्यास विहिरीतून बाहेर सुखरूप काढले. सदर मोहिमेत स्थानिक वनकर्मचारी, वनसेवक यांच्यासह सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष विजय वाळुंजे, संदीप साबळे, प्रभाकर साबळे, विजय आधाने, गणेश कुलकर्णी व इतर ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.

विहिरीतून सुरक्षित बाहेर काढलेल्या मादी बिबट्याची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी झाली. यात मादी बिबट्यास कोणतीही दुखापत नाही, असे निदर्शनास आले व मादी बिबट्याची तब्येत ठणठणीत असल्याने आज रोजी दि. 6 रोजी पशुवैद्यकीय अधिकारी यांचे निगराणीत मादी बिबट्याचे पुनःतपासणी करून मादी बिबट्या वन्यप्राणी ठणठणीत असल्याची खात्री केली. तसेच वरिष्ठ वनाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार त्यास नैसर्गिक अधिवासात सुरक्षित सोडून देण्यात आले.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शालिवाहन विद्यालयाची प्रभातफेरी

आधुनिक केसरी न्यूज




**पैठण :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शालिवाहन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या तसेच पर्यावरणाविषयी व कोरोनाविषयक घोषणा देऊन पालकांची जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

या प्रभात फेरीमध्ये विद्यालयाचे सर्व विद्यार्थी पारंपारिक वेशभूषा करून अत्यंत उत्साहाने सहभागी झाले. सदरील प्रभात फेरी पॉवर हाऊस, तीर्थखांब, जुने तहसील, भाजी मार्केट पोस्ट ऑफिस या मार्गे पुन्हा विद्यालयात परतली. नंतर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांची भाषणे झाली. यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक जालिंदर फलके, राजेश गोंडे पाटील, दिपाली पटेल, सुनील पायघन, कैलास मोरे, शारदा देवढे, संजय काळे, शिवनाथ चितळकर, ज्योती साबळे, संजय शिसोदे पाटील, नामदेव बेल्हेकर, रमेश शिंदे आदींनी परिश्रम घेतले.



# औराळा ते गव्हाली रस्त्याची दयनीय अवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा ते गव्हाली या रस्त्याची गेल्या अनेक वर्षापासून दयनीय अवस्था झाली असून यामुळे वाहनधारकांसह नागरिक त्रस्त झाले आहे. या रस्त्याची ही दुरावस्था गेल्या अनेक वर्षापासून आहे.

या रस्त्यावर कधीही खडी व डांबर पडले नाही, अक्षरशः दळणवळण व शेतीचे अवजारे खत, बी -बियाणे नेण्यासाठी लांबचा पल्ला गाठून या शेतकऱ्यांना शेतात जावे लागते रस्त्यावर असलेल्या चिखला-चिखलातून दुचाकीच काय बैलगाडी ही जाऊ शकत नाही मात्र याकडे कोणाचेही लक्ष नाही विद्यार्थ्यांना पाठीवर दप्तराचे ओझे घेऊन अनवाणी पायाने या चिखलातून मार्गक्रमण करावे लागते याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाने लक्ष देऊन या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

**गेल्या अनेक वर्षापासून औराळा ते गव्हाली रस्त्याची दुरुस्त झाली असून याकडे कोणताही स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार खासदार हे ग्रामीण भागातील रस्त्यांवर लक्ष देत नाही. ग्रामीण भागात आतापर्यंत कोणतेही विकास कामे झाले नाही. आम्ही लोकप्रतिनिधीकडे यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही याकडे कोणताही लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही.**

**सुनील वाघचौरे, धनगरवाडी शेतकरी**

**तालुक्यातील लोकप्रतिनिधींच्या निष्काळजीपणामुळे औराळा ते गव्हाली या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. लोकप्रतिनिधी मतदान मागण्या करता येतो निवडून आल्यानंतर गावाकडे पलटून पाहतही नाही. येणाऱ्या काळात आम्ही ग्रामसभेमध्ये एकमताने ठराव मंजूर करून मतदानावर बहिष्कार टाकणार आहे.**

**भारत वाघचौरे, धनगरवाडी शेतकरी**

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in